म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ...........
दा. क्र. : ३६८५



BVBK-0403645

# विद्येच्या वाटेवर...

## लैला महाजन

रजि नं. ८१०९९ / वाचनालय

# विद्येच्या वाटेवर

बी.वा.
3६८५
६/3/2000

लैला महाजन

3६८५ ६/3/2000
बी.वा.

BVBK-0403645

समर्थ साई वितरण

*प्रकाशक / मुद्रक*
सुनील अंबिके
श्री समर्थ साई वितरण
१५६, मंगळवार पेठ, पुणे ११.

पत्रव्यवहार
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११००१.

© प्रकाशकाधिन

*प्रथमावृत्ती*
२ ऑक्टोंबर १९९९

*मुखपृष्ठ*
मेघनील, पुणे

*मुद्रणस्थळ*
श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११००१.

*मूल्य*
रुपये ३५/-

देवका,

माझ्याकडं काम करणारी मुलगी.
जिच्या मदतीमुळं
मला लिहायला उसंत मिळाली.
तिला... तिच्या दैवताबद्दलचं
हे पुस्तक कृतज्ञ भेट.

मुलामुलींनो, बाबासाहेबांनी शिक्षणासाठी किती कष्ट घेतले. त्याची थोडीशी झलक ह्या पुस्तकातून मिळाली का ? ते कळावं ह्यासाठीच हे पुस्तक लिहिलंय. तुमच्यासाठी. तुम्हाला हे कसं वाटलं ?... कळवाल का ? कळवाच...

**– लैला महाजन**
कृतार्थ जीवन, टिळकनगर १,
एम. जी. मार्ग, गोरेगाव,
मुंबई ४०००६२.

# अनुक्रम


१) आईबरोबर / ७
२) मिळवली अंडी पिटली दवंडी / १०
३) शाळेत दाखल / १५
४) भजन / २०
५) शाळेतील शिवाशिव / २६
६) ढब्बू पैशाची गोष्ट / ३२
७) शिंदनाकाबरोबर / ३६
८) आंबेडकर कसे झाले? / ४२
९) वडिलांकडे - गोरेगावला / ४८
१०) पेंडसे मास्तरांचं प्रेम / ५३
११) डबक चाळीतला राजहंस / ५७
१२) पुस्तकांचा छंद / ६२
१३) फळ्याला शिवू नको / ६६

# आईबरोबर

3684
ब-व
6/3/2000

''भिवा... ए भिवा''

भीमाबाई म्हणजे भिवाची आई जोराजोरानं त्याला हाका मारीत होती. भिवा भीमाबाईचं चौदावं रत्न अं.. हं.. तशा अर्थानं नाही म्हंजे चौदावं मूल! शेंडेफळ! शेवटचं मूल आईचं नेहमीच खूप लाडकं असतं, असं म्हणतात. पण हे भिवाच्या बाबतीत तितकंसं खरं नव्हतं. तो सर्वांचाच लाडका होता. कारण बघता क्षणीच कुणालाही आवडावा, असं त्याचं गोंडस रूप होतं. त्याचं बोलणं, हसणं सगळंच न्यारं. त्यामुळे आजूबाजूच्या सर्वांनाच तो हवासा वाटे! भीमाबाईला तर जरासा नजरेआड झाला की चैनच पडत नसे.

आत्ताचंच पाहा ना, भिवा मुलांच्यात खेळायला गेला; जरासाच वेळ झाला तर लागलीच तिनं हाका मारायला सुरुवात केली. त्या ऐकून नेहमीप्रमाणं शेजारीण बाहेर आली. हसत हसत चेष्टेनं म्हणाली,

''काय वं भीमाबाई, नाव तं लई कौतुकानं ठिवलंस भीम. पण जवा तवा म्हंतीस भिवा. तुजं ऐकून सगळे त्याला भिवाच म्हणत्यात. त्याचं भीम नाव कुनाच्या ध्यानात पण राह्यलं नाई.''

''अग हं! जेव्हा माझा भिवा खूप मोठा होईल; सगळीकडं त्याची कीर्ती जाईल, आपल्या कुळाचं नाव गाजवील, तेव्हा त्याच्या कर्तबगारीनं तो आपोआप भीम होईल. लोकही त्याला भीमरावच म्हंतील.'' भीमाबाईनं ठसक्यात, अभिमानानं उत्तर दिलं न् परत हाका मारायला लागली, 'भिवा रे...'

चार वर्षांचा गुटगुटीत, गोरापान, तिच्या सारख्या कुरळ्या केसांचा भिवा धावत आला. भीमाबाई म्हणाली,

"खाऊन घे राजा भाकरी. मला जात्यावर बसायचं."

"मीसुद्धा तुझ्याबरोबर दळणार." भिवानं हट्ट केला आणि ती जेव्हा दळायला बसली तेव्हा भिवानं खरंच खुंट्याला हात लावला. खुंटा ओढणं जमेना पण मग आईच्या मांडीवर डोकं ठेवून पडला. तिनं एका हातानं त्याला थोपटलं अन् दुसऱ्या हातानं जात्याचा खुंटा धरला. भीमाबाई अंगानं भक्कम होती आणि काम पण भराभरा करायची. तिच्या पटाईत हातानं खुंटा पकडला. सरासरा ओढला, अन् वरची तळी जशी पळू लागली.

"असं फार मस्त वाटतं ग." मांडीवर पडलेला भिवा लाडात येऊन म्हणाला.

"बरं... बरं." म्हणत भीमाबाईनं जोरात दळायला सुरुवात केली. जात्यातून भुरुभुरु पीठ पडू लागलं. अन् भीमाबाईच्या गळ्यातून गाणं.

"असा मारिला इंद्रजीत, भुज पडली अंगणात
पतिवरता सुलोचना कुंकू लावी मंदिरात."

"बय ए बय" भिवा आईला म्हणाला.

"आता आणि काय रे बाबा?"

"माझं नाव घालून म्हण ना जात्यावरचं गाणं. म्हणशील?"

भीमाबाई हसली पण काही बोलली नाही. भिवा हिरमुसला. तेवढ्यात जात्याच्या घरघरीपेक्षा उंच अन् मोठ्या आवाजातली आईची ओवी कानी आली,

"भिवा माझा चांद सुर्व्या खाण हिऱ्यामाणकाची
धनवंत कुबेरीण झाले मी ग माय त्याची."

'बय... बय.' आईनं गाणं म्हटलं त्यावरून काहीतरी आठवल्यासारखं भिवा म्हणाला, "बय, तुझ्या माहेरी खूप श्रीमंती होती म्हणे?"

"हो रे बाबा. फार अमीर मुरबाडकर माणसं. सणासुदीच्या दिवशी चांदीच्या भांड्यात जेवायचो आम्ही. आमच्या घरच्या बाया जरीचं शालू, पैठणी नेसायच्या. अंगाखांद्यावर सोन्याचे ढीगभर दागिने वागवायच्या."

"तू पण पैठणी नेसायचीस?"

"अरे, तेव्हा मी होते ल्हान. मला पैठणी नसे पेलवत.

म्हणून नाही नेसले. पण पायात सोन्याचं तोड घातलंत.''

''मग मोठी झाल्यावर, तेव्हा नेसलीस ना पैठणी ?''

''मोठी व्हायच्या आधीच तुझ्या बापाची बायको झाले. लग्न झाल्यावर सासरचं तेच मोलाचं मानाचं. माहेरचं कशाला घ्यायचं ?''

''आपल्या इथं तर त्यांच्यासारखं काही नाही.''

''नसं ना का !''

''आपण तर गरीब. नाही का गं बय ?''

''हो असू दे गरीब.''

''मग तरी तू कुबेरीण कशी गं ? आता जात्यावरच्या गाण्यात म्हटलीस.'' भिवानं गोंधळून विचारलं.

भीमाबाईनं दळणं थांबवलं. दोन्ही हातांनी भिवाला जवळ घेतलं. अन् त्याचे मटामट मुके घेत म्हटलं,

''तुझ्यामुळं बरं बाळा ! तुझ्यामुळं माझ्या लेकरा. देवानं तुझ्यासारखा हिरा दिला मला. दृष्ट लागंल असा देखणा पोरगा, म्हणून मी कुबेरीण.''

''देखणा काय मी एकटाच आहे ? जगात खूप आहेत. वाण्याबामणाची पोरं किती रुपवान असतात तूच म्हंतेस.''

''पण ती आमची नव्हे बाळा. तू आमचा आहेस. आमच्या घरात तुझ्यासारखा देखण्या रुपाचा-गुणाचा असा दुसरा कुनी नाही. अरे, अख्ख्या वस्तीतसुद्धा नाही. आणखी एक सांगू का ? आम्हाला म्हंजे मला पण अन् तुझ्या बापाला पण ! दोघांनाही वाटतं, तू खूप मोठा होशील फार फार शिकशील. आपल्या लोकांसाठी झटशील. जग, दुनिया तुला वाखाणील. शिरीमंती काय नसत्या भरपूर रुपाया-सोन्याचीच नसती. तू माझी लाखमोलाची ठेव ! मोठा किमती ऐवज आहेस रे बाबा आमचा.''

भीमाबाईचे, भिवाच्या बयचे, आईचे वेगवेगळ्या अर्थाने हे बोल खरे ठरले ! बाबासाहेब अस्पृश्यांच्या अंधार जीवनात, काळ्याकुट्ट काळोखी जिण्यात तेजस्वी सूर्य बनून आले. भारताचे भूषण झाले.

□ □ □

# मिळवली अंडी पिटली दवंडी

"हा भिवड्या चिवड्या अजून कसा येईना?"

जमलेल्या प्रत्येक पोरानं असं म्हणून झालं. चवड्यावर उभं राहून, मान उंचावून, डोळे बारीक करून लांबवर पाहून झालं. पण भिवा दिसला नाही. सगळे बेचैन झाले. सातारा लष्कर भागात राहणारी महारवाड्यातली ही मुलं. भिवा राहत होता तिथं जवळच बंगल्यात. त्याचे वडील सुभेदार मेजर. तरीही हीच पोर त्याचे खेळगडी आणि तो जसा त्यांचा पुढारीच. खरं तर त्या सगळ्यांत तोच लहान होता. म्हंजे अवघा पाच-सहा वर्षांचा. ते सगळे त्याच्यापेक्षा वयानं मोठे. पण भिवा म्हणेल तेच करायचं. त्यानं सांगितलेलं ऐकायचं. त्याचं म्हणणं मुकाट मानायचं, असा सगळा मामला होता.

देवळेकरांच्या घरासमोर एक वडाचं झाड होतं. खूप मोट्ठं. तिथं छान सावली असायची. म्हणून भरदुपारीसुद्धा मुलं तिथंच जमायची. झाडावर चढून फांद्यांत लपून मस्ती करायची. सूरपारंब्या आणि बाकीचेही खेळ खूप खेळायची. खेळायला सगळी मुलं उतावीळ झाली होती. पण पुढारी आला नव्हता. वाट पाहून शेवटी एकजण म्हणाला,

"चला जाऊ या घरी."

बाकीच्यांनाही असंच वाटलं अन् ते जायला निघाले. तेवढ्यात धावत पळत येणारा भिवा दिसला. तो जवळ येताच सगळ्यांनी गराडा घातला. "का रे उशीर का केला?" असा त्याच्याभोवती गलका सुरू केला.

"सांगतो.. सांगतो." भिवा धापा टाकीत म्हणाला.

"नाटक करू नकोस रे सोंगाड्या." दोघं-तिघं म्हणाले.

मग मात्र भिवा खवळला. म्हणाला,

"चाललो मी परत."

"अरे पण का? अरे का?" प्रत्येकजण विचारू लागला.

"मग काय? घरातून सगळ्यांच्या नजरा चुकवीत यायचं म्हंजे कोण तारेवरची कसरत करावी लागते." भिवा एवढंच बोलून थांबला.

भिवाचं म्हणणं सगळ्यांना पटलं. कारण त्याच्या लष्करी वडिलांची शिस्त फार कडक होती. त्यातून भिवा महादंगेखोर. खोड्या, भांडणं, मारामारी करण्यात पहिला नंबर. त्यानं घराबाहेर पडू नये, बाहेरच्या कागाळ्या आणू नये म्हणून सगळेच त्याच्यावर पहाऱ्याला बसलेले. त्यांच्या तावडीतून निसटणं फारच अवघड. पण भिवा ते करायचा. रोज, न चुकता. अन् खेळायला यायचा. आपल्या बोलण्यानं सगळे कसे ओशाळलेत; त्यानं पाहिलं. अन् पुढं म्हणाला,

"इथं यावं धडपडत तर.. तुम्ही रागानं विचारता. बरं जाऊ दे ते. आधीच उशीर झाला. काय खेळू या? करा पटकन सुरुवात." पण कुणीच हलेना.

"खेळायची हुक्की गेली बघ." एकेकानं सुनावलं.

भिवा हसला.. "हां.. खेळायची हुक्की गेली. म्हंजे खायची तलफ आली असेल."

"बरोबर ओळखलंस गड्या." शिदनाक म्हणाला.

"चला तर.. उचला दगड" आजूबाजूच्या आंबा, पेरू, जांभळांच्या झाडांकडे पाहत भिवा म्हणाला.

"छ्या.. तसलं काही नगं." कुणीतरी मोडता घातला.

"मग काय लाडू-पेढे हवेत तुम्हाला?" भिवानं विचारलं.

"ते तर.. वाणीबामन खातात. आपण कोंबडीचं लाडू-पेढं खाऊ." सगळ्यांचं एकमत भिवानं ऐकलं. अन् तो विचार करू लागला. तर सर्वांनी न बोलता खुणेनं पिंपरीकराचं घर दाखवलं.

पिंपरीकरबुवा भिवाचे नातेवाईक. गोरागोमटा, हसरा, बडबड्या भिवा त्यांच्या बायकोचा खूप लाडका. त्यांच्या घरात भिवाचं खूप कोडकौतुक व्हायचं. हव्वं ते खायलाही खूप मिळायचं.

"बयच्या घरात खूप कोंबड्या. म्हंजे अंडीपण असणारच.

हां.. आत्ता आठवलं, तिनं अंड्यावर कोंबडी बसवलीय.'' भिवानं दोस्तांना सांगितलं.

तसं सगळ्यांनी त्याला मुद्दामच चिडवलं. ''ह्यँ. ती तुझं खूप लाड करती. पण म्हणून काय अंडी देईल व्हय? दाखवच आणून.'' भिवाला इरेला पाडलं. आव्हान दिलं, की तो हट्टाला पेटून आपल्याला हवं ते करतोच. मुलांना हे माहीत होतं. आत्ताही तसंच झालं. अन् कोंबडीचे लाडू-पेढे नव्हे, अंडी आणायला भिवा महाराज निघाले. पिंपरीकरांच्या घरात शिरले.

सहजच आल्यासारखं दाखवीत मग भिवा पिंपरीकरबाईंना म्हणाला, ''बय.. दुपारची वेळ.. तू झोपली नाहीस?''

''नाइ रं बाळा.. बस. काय खाऊ देऊ माज्या राजाला?''

''काही नको. पोटात जागाच नाही. एक सांगू का तुला? बय.. घर फार छान ठेवतीस.'' भिवा खोट्या कौतुकानं म्हणाला.

आणि मग इकडं तिकडं नजर फिरवत वर शिंक्याकडं आपोआपच पाहिल्याचं सोंग केलं. नाटकी कुतूहलानं विचारलं,

''बय, शिंक्यात काय ठेवलंस ग? बरीच मोठी टोपली दिसतीय.''

''अरं बाबा, अंड्यावर कोंबडी बसवलीय.''

''हो? ..बरं झालं अशी उंचावर टोपली ठेवलीस. म्हंजे बोक्याचं भय नाही.. किती दिवस झाले ग कोंबडी बसवून?''

''अं...'' करीत बाईनं बोटं मोजली. अन् म्हणाली, ''धा धा दिस झाले.''

''किती दिवसांनी पिलं येतात गं अंड्यातून बाहेर?''

''येडा रं येडा. आरं पिल्लू आपसूख नाय येत. कोंबडी काढती. पंधरवडा लागतो बघ.''

''मला तं आत्ताच क्रॅक.. क्रॅक.. आवाज येतोय बघ बय.''

बाईनं कान टवकारलं. तिच्या मनात संशय आला. हे भिवानं ओळखलं. तो साळसूदपणं लाडीगोडीत बोलला,

''बय. कोंबडीला बसवून दहा दिवस झाले ना. अगं, तिनं काय केलं, एकदा तरी पाह्यलंस का?''

''नाही रे बाबा.''

''मला वाटतं बघून घे.. लवकर बघून घे. तू अशी खाली

वाट बघत बसशील. आत्ता पिल्लं मिळतील. आत्ता पिल्लं मिळतील अन् वर ती कोंबडी काही करणारच नाही. म्हणून म्हणतो..''

''खरं रे बाबा तुझं. तसा तू फार शाना आहेस बघ. लय चांगल्या डोक्याचा..''

''माझ्या आपलं मनात आलं ते तुला सांगितलं. आत्ताच बघू का? उशीर झाला तर घोटाळाच होईल. कोंबडी पिल्लं काढणार नाही.. अंडी मात्र जातील नासून..''

भिवानं असं म्हणताच बाई झटपट उठली. तिनं पटकन शिंक्यावरची टोपली काढली, जमिनीवर ठेवली. भिवा पटकन् पुढं आला. त्यानं झटकन् टोपलीवरचं झाकण काढलं. कोंबडीला उचललं. अंडी पुष्कळ होती. ती पाहून भिवाच्या तोंडाला पाणी सुटलं. तेवढयातही त्यानं मनातल्या मनात हिशोब केला. एकेकाच्या वाट्याला किती येतील? अर्थात स्वत: सोडून. कारण त्याचा वाटा इतरांपेक्षा मोठा. जास्त. दहा-बारा क्षणच झाले पण भिवाला गप्प पाहून बाईनं विचारलं ''काय झालं रे?''

विचारात पडल्याचा आव आणीत भिवा म्हणाला, ''बय, ज्याची भीती तेच घडलंय.. अगं, अंडी जश्शीच्या तश्शी. म्हंजे ह्या कोंबडीनं दहा दिवसात काहीपण केलं नाही.'' बाई ऐकून थोडी काळजीत पडली. मग भिवाच परत बोलला,

''ही कोंबडी वेगळीच दिसते. ही पिल्लं नाही काढणार. अग बय, ह्या अशा कोंबडया अंडी नुसती नासवतात.'' भिवाच्या बुद्धीवर बाईचा भलताच विश्वास. त्याचं म्हणणं तिला खरं वाटलं. ती वारंवार म्हणायला लागली.

''बरं झालं रे बाबा. तू टोपली काढायला लावलीस.''

''अगं, पण आता पुढं काय करणार?''

'आता दुसरी कोंबडी बसवते ह्या अंडयावर.''

''दुसरी कोंबडी तर बसवच पण ह्या अंडयावर नको.''

''का रे बाबा! का बरं?''

''माझं म्हणणं पटतं का बघ. माझं ऐकच, जबरदस्ती नाही.''

''अरं तू सांग तर खरं..''

''ह्या अंडयावर तू दुसरी कोंबडी बसवणार. बरोबर?''

"हा."

"ह्या अंड्यावर आधी एक कोंबडी बसली होती. हे त्या दुसऱ्या कोंबडीनं पाहिलं असेल. आता त्याच अंड्यावर आपल्याला बसवलं, हे त्या दुसरीला आवडेल का? तूच सांग आवडेल का?"

बाई विचारात पडल्या तसा भिवाच पुढे बोलला,

"नाही ना आवडणार? मग ती पिल्लं काढील का? आणि दुसरं, ही अंडी दहा दिवसांची जुनी. ती दोन-तीन दिवसात खराब होणार."

"खरं म्हंतोस बाळा. मग काय करू आता?"

"दुसरी कोंबडी दुसऱ्या अंड्यावर बसव आणि ही अंडी त्यातली ७-८ बुवांसाठी खायला ठेव बाकीची मला दे लागलीच. आत्ताच्या आत्ता कर. नाहीतर एवढी सगळी अंडी फुक्कट जातील."

"व्हय रं राजा... तुला ना मला अन् घाल कुत्र्याला, असंच व्हईल बघ." बाई म्हणाली.

"नासकी अंडी कुत्रंसुद्धा खायचं नाही बय." भिवानं आणखी शहाणपणा दाखवला.

"एवढासा जीव पण तू लई हुषार बाबा. बरं केलंस, लई लई चांगलं केलंस. कुनाच्या तरी मुखी लागतील अंडी. तू बोललास म्हणून हे घडतंय.. नाहीतर पार माती झाली असती सोन्यासारख्या वस्तूची. घे.. बाबा घे.. पाह्यजे तर सगळी ने.." बाई मनापासून म्हणाली.

"नको.. नको.. बुवांना ठेव. तुझ्यासाठी राहू दे." म्हणत उदारता दाखवित भिवानं अंडी उचलली.

झाडाखाली भिवाचे मैतर नव्हे, खाऊ दोस्त वाटच पाहत होते. भिवाला उचलून घ्यावं असंच सर्वांच्या मनात आलं. पण भिवानं एवढी चतुराई दाखवून मिळवलेली अंडी फुटतील, तोंडाचा घास जाईल, म्हणून त्यांनी आपल्या वयानं लहान पण बुद्धी-कृतीनं महान भिवाची हजार वेळा तरी वाहव्वा केली. मिळवली अंडी म्हणून भिवाच्या हुषारी-चातुर्याची मुलांनी पिटली दवंडी!

□ □ □

# शाळेत दाखल

बाबासाहेबांचे वडील सुभेदार रामजी सैन्यात होते. सुरुवातीला ते पलटणीत होते. नंतर त्यांची १०६ वी पलटण बंद करण्यात आली. मग ते १४ वर्षे पलटणीच्या शाळेत शिकवायचे. ते स्वत: मॅट्रिक होते. इंग्रजी, गणित, इतिहासावर त्यांचं प्रभुत्व होतं. उंच, गोरे, शरीरानं धिप्पाड असलेले सुभेदार फार रुबाबदार वाटायचे. त्यांचे कपडे खूप साधे असत आणि डोक्याला ते सफेद फेटा बांधीत.

मिलिटरीतल्या महारांना अस्पृश्यतेचा अजिबात भास नसे. उलट मानमरातबच मिळे. चांगला पगार आणि बाकीच्या सुखसोयी! त्यामुळं त्यांना दारिद्र्य माहीत नव्हतं. एवढंच नव्हे तर मिलिटरीत नसलेल्या त्यांच्या इतर जातभाईंना समाजाकडून जी हीन, अपमानास्पद, जनावरांपेक्षाही वाईट वागणूक मिळे, त्याचाही अनुभव नव्हता. त्यांच्या मुलाबाळांसाठी शिक्षणाची फुकटात सोय होती. थोडक्यात मिलिटरीतील महार सुख, सन्मान, संपन्नता, सुस्थितीचेच जीवन जगत होते. तरीसुद्धा भिवाला मिलिटरीत पाठवण्याचा रामजींचा मुळीच विचार नव्हता. रणभूमीवरच्या लढवय्यापेक्षा किंवा सैन्यातल्या अधिकाऱ्यांपेक्षा त्यानं विद्वान व्हावं, बौद्धिक क्षेत्रात उच्च स्थान मिळवावं असंच त्यांना वाटे. म्हणूनच भिवानं बुद्धिमान व्हावं, बहुश्रुत व्हावं, ह्यासाठी ते दिनरात झटत होते. शाळेत जाण्याआधीच त्यांनी भिवाला घरी शिकवायला सुरुवात केली होती. पूर्वी दापोलीला असताना आनंदा, भिवाचा मोठा भाऊ मराठी शाळेत जात असे. भिवाही कधी कधी गंमत म्हणून त्याच्याबरोबर जाई. त्याच्या वर्गात बसे. त्यामुळं छोट्या भिवाला अक्षरंही ओळखता येत होती.

दापोली सोडून रामजी साताऱ्याला आले होते. लष्कर भागात

राहत होते. तिथल्याच कँपस्कूलमध्ये आनंदा शिकत होता. ह्याच शाळेत सुभेदारांनी भिवाला घालायचं ठरवलं होतं. त्यांना ज्योतिषशास्त्र माहीत होतं. त्यानुसार त्यांनी एक मुहूर्त काढला. मग त्या दिवशी सकाळी त्यांनी भिवाला अभ्यंगस्नान घातलं, नवे कपडे घातले. तो नोव्हेंबर महिना होता. बाबा दिवाळी होऊन गेली तरी परत आपल्याला दिवाळीसारखीच आंघोळ का घालतात, नवे कपडे का देतात? भिवाला कळेच ना. नंतर रामजींनी त्याला गणपती, सरस्वती ह्या विद्येच्या दैवतांची पूजा करायला लावली. हे सगळं आटोपल्यावर 'चल आज तुला शाळेत घालणार' असं सांगितलं. नव्या कपड्यातला गोरा, गुटगुटीत, कुरळ्या केसांचा भिवा असा राजबिंडा-गोड दिसत होता की, त्याच्या मीराआत्याला राहवेच ना; तिनं त्याचे मुके घेतले.

"हे काय गं बय? मी का आता कुक्कुलं बाळ आहे? शाळेत चाललोय ना मोठा झालो." भिवा कुरकुरत म्हणाला. मनातून तर त्याला हे खूप आवडलं होतं. आईची आठवण झाली होती. शाळेत नाव घालायला निघालो, अशावेळी आई काय म्हणाली असती बरं? आत्या म्हणतेय तसंच?

"हो... हो माहीत्ये. शाळेत चाललास. पण नीट ऐक भिवा, तू किती पण मोठा हो. म्हंजे शिकून वा वयानं वाढून. मी तुझं असंच मुकं घेईन. तू जगासाठी मोठा, माझ्यासाठी नाही. मला तू नेहमीच लहान! माझं बाळच! समजलं?"

रामजी त्याला घेऊन शाळेत आले. ते खूप खुषीत होते. पण भिवा मात्र भयंकर घाबरला होता. कारण... तो पाहत होता. वर्गावर्गात मुलं बसली होती. त्याच्याएवढी! त्याच्यापेक्षा मोठी! पट्टीवर! एकामागं एक ओळीत. बाप रे! शाळेत जायचं म्हंजे हे असं दिवसभर बसायचं? नुसतं मांडी घालून? पाय पसरायचे नाही! उठायचं नाही, उड्या मारायच्या नाही. त्याला इतके दिवस केलेलं सगळं आठवलं. दिवसभर खेळणं, मस्ती, मारामाऱ्या! ह्या फांदीवरून त्या फांदीवर जायचं, झाडाला लोंबकळायचं, छपरांवर उड्या मारायच्या, झाडांवर चढायचं, झाडातच लपायचं, पार वर शेंड्यापर्यंत पोचायचं अन् मग धपकन जमिनीवर छानपैकी पडायचं, म्हंजे उडी घ्यायची.

आपल्या सारख्या चुळबुळ्याला असं नुसतं बसणं जमेल? त्याच्या मनात आलं, एका जागी बसवून ठेवणारी शाळा नकोच. जावं पळून! पण तो कुठं मोकळा होता? रामजींनी त्याचा हात धरला होता आणि ह्या बळकट मिलिटरीवाल्याच्या पकडीतून आपला हात सोडवून घेणं? छे अशक्य! महाअशक्य. हाताला थोडासा हिसडा देऊन पाह्यलं. अन् भिवाला कळून चुकलं. तेवढ्यात त्याला आणखी एक जाणवलं.

गडबड, गलका सोडाच. पण कुठल्याही वर्गातून मुलांचा जरासाही आवाज येत नव्हता. अख्ख्या शाळेत कसं शांत शांत होतं. नाही म्हणजे मास्तरांचं बोलणं ऐकू येत होतं. ते शिकवत होते ना. पण मुलं! गुडीगूप! चुडीचूप! सगळ्यांच्या तोंडाला कुलूप! देवा रे देवा! हे संकट तर फारच भयंकर! मला तर सारखी बडबड बडबड करायची सवय. कसं निभणार इथं? मारुतीराया, म्हसोबाराजा, मरी आई ग, हेडमास्तराला सद्बुद्धि दे. त्यांनी बाबांना सांगू दे. म्हणू दे, तुमच्या पोराला नाही घेणार आम्ही शाळेत. तेवढ्यात त्याला काही ऐकूही आलं पण हेडमास्तर नव्हते बोलत त्याला हवं तसं. तर –

''मागं मागं काय ओढतोस मला? मध्येच थांबतोस कशाला?'' असं बाबाच दटावत होते.

तो परत त्यांच्या बरोबरीनं चालू लागला. पण तरीही मान वळवून वळवून पाह्यलंच त्यानं! बाप रे! छडी? म्हंजे इथं मारतात की काय? मारामारी हा तर भिवाचा भयंकरच आवडता विषय! पण इथं फक्त मास्तरच मारत असावेत. त्याला तर मार खाण्याची मुळीच सवय नव्हती. आजवर तो दुसऱ्यांना मारतच आला होता. मारामारी करत आला होता. समजा! मास्तरांशीच मारामारी केली तर? मज्जाच ना? शाळेत जरासा जीव रमेल! पण इथं असं चालेल? शाळेत ह्या गोष्टीला परवानगी असते? विचारलं पाहिजे बाबांना. त्यांना सगळी माहिती असते. कित्ती हुषार आहेत आपले बाबा. त्यानं बोलायला तोंड उघडलं तर बाबाच काहीतरी बोलत होते. ते चालत नव्हते. जागीच उभे होते. त्यामुळे इंजिन थांबल्यावर डबा थांबतो ना तसा तोहीं थांबला. त्यांनी त्याचा हात जरासा खेचला. अन् मोकळा सोडला.

लागलीच तो भानावर आला. त्याच्या आत्ता लक्षात आलं की ते एका खोलीत होते. खुर्चीवर कुणी बसलेलं होतं. म्हंजे ते बहुधा हेडमास्तर! अन् हे त्यांचे हापीस!

"हा माझा मुलगा." बाबांनी त्यांना सांगितलं. हेडमास्तरांनी भिवाकडं लक्ष्यपूर्वक पाह्यलं. भिवानं लागलीच त्यांना नमस्कार केला अन् बोलायला सुरुवात केली,

"माझं नाव भिवा रामजी आंबावडेकर. वय पाच पूर्ण. मला बाराखडी येते. म्हणून दाखवू का?"

"फारच तरतरीत, धीट, हुषार दिसतोय तुमचा मुलगा." हेडमास्तर म्हणाले.

बाबांचा चेहरा आनंदी झाला. शाळेत गेल्यावर घडाघडा बोल, हे सांग ते कर! असं बाबांनी त्याला कितीतरी वेळा सांगितलं होतं. तेच त्यानं केलं त्यामुळंच. ह्यात आपली हुषारी कसली? हे त्याला कळेना. त्याला एवढंच बोलायला सांगितलं होतं. त्यामुळं त्याचं काम संपलं होतं. म्हणूनच ते दोघं एकमेकांशी बोलू लागले. तसा भिवा नवलाईनं खोलीभर नजर फिरवू लागला. काय काय होतं तिथं?... खडूची खोकी! भिंतीवर जगाचा नकाशा! देशाचा नकाशा! खूप चित्रं.. फोटोच्या तसबिरी! हे कोण? इंग्रजी दिसतात. तिकडचे राजाराणी का? नाही येत ओळखू. हे कोण? ते नवखे चेहरे पाहता पाहता तो चकीत झाला.

...पाहतच राह्यला. अरे! हे तर शिवाजी महाराज. आमचा शिवाजी! शिवाजी भिवाला खूप खूप म्हंजे खूप आवडायचा. त्याची हातातली उंचावलेली तलवार पाह्यली की भिवाला वाटायचं, आपणच ती सपासपा चालवून शत्रूला चीत करतोय. शिवाजीचा घोडा पाहिला की, सगळ्यांना हरवून आपण पुढं पुढं दौड करीत मजल मारतोय. असं त्याच्या मनात यायचं. शिवाजीचा चेहरा पाह्यल्यावर तर त्याला असा आवेश यायचा... की विचारूच नका. आताही तसंच झालं. त्याच्या अंगात उत्साह संचारला, हिंमत आली, ईर्ष्या भरली. शाळेबद्दल वाटलेल्या भीतीच्या राक्षसाची... बागुलबुवाची त्यानं जशी मानगूटच धरली. अन् घ..ब घाबरगुंडीला दूर दूर फेकलं. अगदी पळवूनच लावलं. मग तो मनातच म्हणाला, छे, त्यानं जशी प्रतिज्ञाच केली,

'शिवराया, तुम्ही सोळाव्या वर्षी रोहिडेश्वरावर स्वराज्याची शपथ घेतली. तसं... मी... मी...' पुढं त्याला शब्द सुचेनात. बाबा आत्या नेहमी म्हणतात ते... काय बरं! हं आठवलं ज्ञानाचं भंडार!

'तुम्ही स्वराज्य मिळवलं तसं मी ज्ञानाचं भांडार मिळवीन.' भिवाची मनातल्या मनात चाललेली प्रतिज्ञा संपली.

एवढ्यात बाबा त्याला घरी चल म्हणाले. कारण रजिस्टरमध्ये त्याचं नाव लिहून झालं होतं. हेही बाबांनीच सांगितलं. रजिस्टर म्हंजे काय बाबांना विचारावं वाटलं. पण तो गप्प राहिला. निघताना त्यानं हेडमास्तरांना परत नमस्कार केला.

"तुम्ही मिलिटरीतले लोक फार शिस्तशीर! मुलाला छान वळण लावलंय." हेडमास्तर म्हणाले.

बाबा चटकन म्हणाले, "आभारी आहे!"

हेडमास्तरांना हे ऐकून थोडं आश्चर्यच वाटलं. अशा रीतीभाती त्यांनी आजवर अनुभवल्या नव्हत्या. ते कौतुकानं म्हणाले,

"चांगल्या झाडावर चांगलीच फळं येतात. हे तुम्हां दोघांकडे पाहून पटलं."

नाविन्याच्या वेगळ्या भावनेनं भरलेल्या भिवाला आता बाबांबरोबर शाळेतून निघताना वर्गावर्गातली भिंतीवरची पक्ष्यांची, फुलांची, थोर माणसांची छान, छान चित्रच फक्त दिसत होती. शाळा म्हंजे अलीबाबाची गुहाच! इथं किती गंमत येईल. नवं नवं दिसेल, दूर दूरचं कळेल असं तो म्हणत होता. वारंवार पुन्हा पुन्हा.

□ □ □

# भजन

''मिराबाई उठले का गं सगळे?'' देवघराजवळच्या रामजींनी विचारलं.

''म्हणतोस तर सगळे. पण तुला खरी चौकशी करायचीय भिवाची? हो ना?''

रामजी हसले अन् म्हणाले,

''कसं गं बरोबर मनातलं ओळखतेस?''

''अरे लहानपणापासून आपण एकत्र! एवढ्या वर्षांची संगत. त्यामुळं आपोआपच कळतं बरं.'' मिराबाई म्हणाली.

''बरं... बरं... भिवाला उठव. तो उठला नसला तर!''

''तो केव्हाच उठलाय. पहाटे पाच वाजल्यापासून तुझ्या भूपाळ्या, स्तोत्रं सुरू होतात. खरं तर ती साखरझोपेची वेळ! पण मनात आणलं तरी तुझ्या गजरानं कुणाला झोप येईल का?''

''अगं, पण हा तर माझा रोजचाच नेम!''

''हो... ना! आता सात वाजता पूजेला लागशील. ते नवापर्यंत तुझं नम: नम: चालूच राहील.''

''मिराबाई, आपली संस्कृत भाषा फार सुंदर, संपन्न आहे. मी तर नुसतं वाचतो. मला कळत नाही त्यातलं काही. पण आपल्या भिवाला संस्कृत चांगलं यायला हवं. म्हणून इंग्रजी चौथीत गेला की संस्कृतच घ्यायला सांगणारे त्याला. अगं, संस्कृत मधलं साहित्य, फार वरच्या दर्जाचं आहे. शिवाय एकदा संस्कृत आलं की, मग दुसरी कुठलीही भाषा त्याला अवघड वाटणार नाही. असा संस्कृतचा महिमा आहे. नुसतं नम: नम: म्हंजे संस्कृत नाही.''

''दादा, किती ज्ञानी आहेस रे तू!'' मीराबाई कौतुकानं

उद्‌गारली.

खरंतर मीराबाई मोठी, रामजी धाकटे. पण तरीही मीराबाई त्यांना दादा म्हणायची. कारण आपला भाऊ आपल्यापेक्षा वयानं लहान असला तरी कर्तबगारीत, हुशारीत आपल्याला थोरला आहे, अशी तिची खात्री होती.

"पूजेनंतरच्या भजनाला भिवा पाह्यजे हं." रामजींनी बजावलं.

"तू तर असं सांगतोस की जसा तो माझ्या कैदेतच आहे. तू म्हटल्यावर मी लागलीच त्याला हजर करीन."

"अगं! तूच तर त्याची सगळी. आई... दाई!" असं म्हणून ते काही वेळ गप्प बसले. अन् मग नेहमीच्या आवाजात म्हणाले,

"त्याला म्हणावं आंघोळ करून घे. उगीच वेळ काढू नकोस."

"खरंच फार चांगला आहेस रे दादा तू. खूप वेगळा! आपल्यातल्या बाकीच्यांप्रमाणं दारू पीत नाहीस. शिव्या देत नाहीस. राहतोस कसा निर्मळ. मनात कुणाबद्दल मळमळ नाही. बोलतोस झऱ्यासारखा. झरझर! स्पष्ट!" मीराबाई कौतुकानं म्हणाली.

सरळ स्वभावाच्या रामजीला स्तुती सहन होईना.

"हं... हं... मीराबाई गुळाच्या बऱ्याच भेल्या बनवल्या. भाऊबीजेला भक्कम ओवाळणी देईन ह्यावर्षी."

भावाच्या चेष्टेकडं मिराबाईचं लक्षच नव्हतं. आपल्याच नादात होती ती. पुढं असोशीनं, भरल्या गळ्यानं म्हणाली,

"भिवा असाच होईल. तुझ्यासारखा."

"अगं माझ्यापेक्षा सवाई करणारे मी त्याला."

"करशील बाबा. फार मेहनत घेतोस त्याच्यासाठी. बघतेय ना मी!" एवढं बोलून मीराबाई गेली.

रामजी पूजेला लागले. ते कबीरपंथी होते. त्यांच्या भजन, पूजन, भक्तीमुळे घरात सदाच सात्विक, सोज्वळ, मंगल वातावरण असे. पूजा संपल्यावर नेहमीप्रमाणं त्यांनी हातावर बत्तासा घेतला. त्यावर कापूर ठेवला. तो पेटवला. अन् ते गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील त्यांचे आवडते श्लोक म्हणून लागले.

'नैनं दहति पावकं.' चालू केलं. तेव्हा भिवा तिथं येऊन बसला. त्याची बाकीची भावंडं केव्हाच तिथं येऊन बसली होती.

"हं चल रे. भजनाला सुरुवात कर." रामजींनी सांगितलं. "आज ज्ञानेश्वरांचं 'पैल तो गे काऊ कोकताहे' म्हणूया." बहीण भावंडांच्या बरोबर भिवाही म्हणू लागला. खरं तर तो नुसते ओठ हलवीत होता. त्याचं सगळं लक्ष बाहेर मुलं खेळत होती, तिकडं लागलं होतं. मनात येत होतं, भजन संपेतो भाकरी खायची वेळ होणार. ती खाल्ली की शाळेत जायची. म्हंजे शाळेत जाण्याआधी जराही खेळायला मिळणार नाही. खेळण्यासाठी त्याचा जीव थोडा थोडा होत होता. छे: भजनातून पळ काढून बाहेर जायलाच हवं. तरच थोडं तरी हुंदडायला, खेळायला मिळेल. शाळेत तर काय? शिक्षाच सगळी. नुसतं बसायचं. तुरुंग, कोंडवाडाच तो. त्याचं सोंग सगळ्यांना समजत होतं. भिवा नुसता न न न करीत होता. पण कुणीच त्याला टोकत नव्हतं. नंतर रामजींनी कबीराचे दोहे सुरू केले न केले तोच,

"बाहेर कावळा... नाही बाबा. कुणी हाक मारतंय. कोण आहे बघतो."

असं म्हणत तो जो सरकला. तो सरकलाच. परत फिरकलाच नाही. अर्थात् हे त्याचं रोजचंच होतं. सर्वांना सवय झाली होती. कधी जोराची लागली म्हणायचं. कधी पाणी प्यायला उठायचं. नाहीतरी नकोशी गोष्ट टाळण्यासाठी मुलांना शंभर सबबी सुचतात. त्यासुद्धा अगदी फटाफट!

तो जाताच रामजींनी भजन संपवलं.

"कसा पळाला बघ. तू त्याला जरा ओरडत नाहीस." मीराबाई म्हणाली.

"तू का नाही त्याला धाक दाखवत?" रामजींनी विचारलं.

दोघं एकमेकांना तू त्याचे फार लाड करतो, तू त्याचे फार लाड करतो, म्हणत होते. अन् भिवाची भावंडं हसत होती. खरं म्हणजे घरातलं कुणीच भिवाला मनापासून मारीत नसे. रागवत नसे. कारण तो सगळ्यात लहान. वयानंही लहान. आता भीमाबाई पण नव्हती. भिवा तर सारखी तिची-आईची, आठवण काढायचा. साहजिकच आईवेगळ्या लेकराचे, पोरक्या भिवाचे सगळेजण लाडच करीत.

संध्याकाळ झाली. भिवा खेळून घरात आला आणि भूकभूक

करायला लागला. म्हणून पाची भावंडं जेवायला बसणार, तोच –

"भजन केलंत का रे?" रामजींचा आवाज आला. ह्यावेळी भिवाला पुढं करून फायदा नव्हता. कारण रामजींची शिस्त फार कडक होती. सगळ्यांना कळून चुकलं. आता आपली सुटका नाही. म्हणून रामजींनी विचारल्याबरोबर बाळाराम, आनंदा, भिवा, मंजुळा, तुळसा सगळे देवघरापाशी गेले. जिथं रामजी बसले होते तिथं. सकाळचं भजन चुकवलं तर माफ व्हायचं. पण रात्री कुणी आला नाही तर त्याची धडगतच नाही.

"काय रे भिवा, भजनातून सकाळी पळून गेलास!" रामजींनी खोट्या रागानं म्हटलं.

"नाही... म्हंजे काय बाबा..." भिवा गडबडला. पण पटकन सावरून म्हणाला, "सकाळची वेळ किती घाईची. जेवायचं, दप्तर घ्यायचं, शाळेपर्यंत इतक्या लांब चालत जायचं. वर्गात वेळेवर गेलं पाहिजे. नाही का?" भिवानं भयंकरच भोळसटपणा, खोटा नम्रपणा दाखवीत म्हटलं.

रामजींना हे कळल्याशिवाय थोडंच राहतं? ते तर त्याचे बाप होते. शिवाय कितीतरी मुलांचे मास्तरही होते.

"बस... बस.. कळलं. आता तर घाई नाही ना? निवांत वेळ आहे ना? हे बघा. मी परत एकदा सांगतो. संध्याकाळचं भजन चुकवलंत. तर रात्रीचं भोजन बंद. भजनाला आले नाही. तर ह्यांना कुणाला जेवायला देऊ नको. बरं का गं मीराबाई. हं... जोडा हात. करा सुरुवात."

रामजी सुभेदारांनी डोळे मिटून स्वत: चोखोबाचा अभंग सुरू केला. इतरांनी त्यांच्या सुरात सूर मिळवले. भिवा अजून गप्पच होता. समईचा मंद प्रकाश घरातल्या, बाहेरच्या अंधाराला उजळवीत होता. भिवाच्या मनातही प्रकाश उमलत होता. सर्वांचे भक्तीभावानं भरलेले चेहेरे! भिवा भारून गेला. त्याच्या मनात आलं. किती गोड गळे आहेत माझ्या बहिणींचे! आणि माझे भाविक बाबा किती मनापासून अभंग म्हणताहेत! त्याला वाटलं ऐकतच राहावं. पण त्याची तंद्री तुटली वडिलांच्या विचारण्यानं. रामजी म्हणाले, "का रे भिवा? अजून आवाज येत नाही तुझा!" त्यासरशी भिवानं म्हणायला सुरुवात केली. त्यादिवशी खूप रंगून अभंग

म्हटला. त्यानं रामजी खूष झाले. भिवा आज वेगळ्याच विचारात होता.

''बाबा, किती अभंग, ओव्या, दोहे, कवनं पाठ आहेत हो तुमचे. तुमच्याबरोबर म्हणावं लागतं म्हणून तुकाराम, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबाचे अभंग, कबीराचे दोहे तुमच्यामुळं माझेही पाठ झालेत.''

''नुसतं पाठांतर उपयोगी नाही भिवा. त्यात काय सांगितलंय, त्याचाही अभ्यास करायला हवा.''

''तसं थोडं थोडं काही काही मनात येतं माझ्या... मी विचार करतो. का बरं ह्यांनी असं लिहिलं?''

''फार छान! अरे, माझ्याप्रमाणं तुझी थोरली बहीणही रामायण, पांडवप्रतापावर निरूपण करते. पण तू पुष्कळ प्रवीण व्हावंस, माझ्या पुढं जावं, अशी फार इच्छा आहे माझी. हे सगळं मी तुला वाचायला, म्हणायला लावतो, अशासाठी की पाठांतरानं तुझी स्मरणशक्ती वाढावी. उच्चार शुद्ध व्हावे. शब्द स्पष्ट यावे. बोलताना तू कधीही अडखळू नये.''

''आता कळलं बाबा मला. शाळेत, बाहेर सगळे माझ्या बोलण्याची स्तुती का करतात?''

''अरे, आपल्या साधुसंतांनी खूप वेगळं तरीही जगायला उपयोगी केवढं तत्त्वज्ञान सांगितलंय.''

''हो ना. तुकारामाचं ते 'निंदकाचं घरं असावं शेजारी, नाठाळाचे माथा देऊ काठी.' झालंच तर कबिराचं 'साधु ऐसा चाहिए. ढाई अक्षर प्रेमका.'' भिवाचं बोलणं ऐकून रामजींना समाधान वाटलं.

भिवाला प्रसंगी हवं तेच पटपट सुचतंय. आठवतंय. म्हणून त्याचं कौतुकही वाटलं. अभिमान पण वाटला. आपण लावलेलं झाड आकाशाच्या ओढीनं उंच उंच वाढतंय, ह्याचा साक्षात्कार झाला. प्रत्यय आला. ते आनंदून म्हणाले,

''हे सारं तुला मोठेपणी भाषण देताना खूप उपयोगी पडेल.'' गुणी विद्यार्थ्याला गुरुजींनी आपल्या सर्व विद्या, सर्व ज्ञान मनोभावे द्यावं तसं रामजी भिवाला नंतर कितीतरी वेळ उपदेश करीत होते. सांगत होते. शिकवत होते.

आंबेडकर पुढं उत्तम वक्ता झाले. संशोधक, लेखक, विद्वान, विचारवंत म्हणून गाजले; त्याचा पाया त्यांच्या वडिलांनी असा तयार केला होता.

मुलांनो, मोठी माणसं, आईबाप, तुम्हाला लहानपणी जे जे करायला लावतात ते तुमच्या चांगल्यासाठीच असतं. हे मोठेपणी कळून काही फायदा नाही. लहानपणीच समजून घ्या. अन् त्यांचं ऐका. त्यांनी सांगितलेलं करायला लागा. आचरणात आणा.

□ □ □

3884
6/3/2000
बा.वा

# शाळेतली शिवाशिव

नेहमीप्रमाणं सगळेजण खेळून, दंगामस्ती करून दमले. म्हणून झाडाखाली बसले. मग मुलं भिवाला म्हणाली,

"ए भिवा, उद्या दुपारी काय खेळायचं. आताच ठरव बरं."

"उद्या दुपारी मी नाही येणार खेळायला." भिवा म्हणाला.

"का रे?" सगळ्यांनी गलका केला.

"उद्या काय कधीच नाही येणार, दुपारचा खेळायला!"

"अरे, ह्याची आत्ते म्हणत असलं. त्याला उनात नको खेळू, तुझा गोरा रंग काळा पडंल."

"अरं, पण बरंच व्हईल. आपन सगळे मातीच्या रंगाचे. हाच तेवढा पांढरा धोप. आपल्यासारखा झाला तर लांबून वळखायला नाय येणार कुनाला. हा आपल्यात हाय."

एकेक सोबती एकेक वेगळं वेगळं म्हणत होता. हे भिवाचं नेहमीचं होतं. काही तरी कोडं घातल्यासारखं बोलायचं. सगळ्यांना बरळू द्यायचं. तोवर आपण गप्प बसायचं. अन् मग खरं सांगून टाकायचं. आत्ताही आपला अंदाज बोलबोलून सगळे थकले. भिवाची खात्री झाली. तेव्हा भिवा म्हणाला,

"उद्यापासून माझी शाळा सुरू होणार. दिवसभर मी तिथं असणार."

ऐकणाऱ्यातला एकजणसुद्धा ह्या बातमीनं खुलला नाही. त्यांच्यातल्या कुणालाच शाळेत जायला मिळणार नव्हतं, म्हणून नव्हे. कारण शाळेत जाणं आपलं काम नाही, हे त्यातला प्रत्येकजण जाणून होता. दांडगाई, थट्टा, खेळ, गंमत. भिवा सगळ्यात पटाईत. त्याच्याविना रंगत येणार नाही. म्हणून ते हिरमुसले होते. शाळेत जायचं म्हणून भिवा मात्र हुरळला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो आनंदाबरोबर निघाला. रस्त्यात लहान-मोठं जे जे कुणी ओळखीचं दिसेल. त्याला भिवा हरखून सांगत होता,

''मी आज शाळेत चाललोय. मी शिकायला चाललोय.''

शाळा जवळ आल्यानंतर विद्यार्थ्यांचे कितीतरी घोळके दिसू लागले. भिवाच्या आजवरच्या सोबत्या-सवंगड्यांपेक्षा ही मुलं खूप वेगळी होती. चांगले कपडे घातलेली! स्वच्छ! टापटीप! आश्चर्याची गोष्ट म्हंजे ती भिवासारखीच भाषा बोलत होती. भिवाला वाटलं, ह्यांच्याशी आपली पटकन दोस्ती होईल. ह्यांच्यात आपल्यात किती सारखेपणा! धावत जाऊन त्यांच्यात घुसावं. गंमतीनं चारचौघांशी धक्काबुक्की करावी. आपली शक्ती दाखवावी. असं त्याच्या मनात आलं. पण आनंदा मागं मागं ओढीत होता. एवढंच नाही तर सगळी पोरं शाळेत गेल्यावर मग तो अंग चोरीत आत शिरला. भिवालाही त्यानं तसंच नेलं. आनंदा फार गरीब स्वभावाचा. म्हणून आपला हा दादा आजवर त्याला खूप आवडायचा. पण आता मात्र रागच आला त्याचा. अन् म्हणूनच मग आपल्या वर्गाकडे जाताना त्यानं आनंदाकडं पाहिलं पण नाही.

वर्गाच्या दाराशी गेल्यावर मात्र आनंदावरचा राग तो विसरून गेला आणि त्यानं बाहेरूनच वर्गात नजर टाकली. आपला वर्ग म्हटल्यावर त्याला तो छानच वाटला. वर्गात सगळी मुलं बसली होती. मास्तरही आले होते. ह्या आंदयानं मागं मागं राहून घोटाळा केला. लवकर आलो असतो तर एकदम पुढं बसता आलं असतं. तो मनातल्या मनातच चडफडला.

त्याला पाहताच मास्तर म्हणाले, ''मुलांनो, हा भिवा रामजी आंबावडेकर.''

भिवाची छाती फुगली. मास्तरांनी आपलं नाव घेतलं. मुलांना सांगितलं म्हणून. 'वा! इथं पण आपली छाप पडली तर! पोरं तर सगळी पेद्रू दिसतात. एका दिवसातच, हरलो बाबा तुझ्यापुढं. तूच आमच्यात वरचढ. सगळ्यांना म्हणायला लावीन, असा भाव देतील मग मला. म्हारवाड्यातल्या पोरांपेक्षा जास्त.' भिवानं स्वत:शीच म्हटलं.

''हा पण तुमच्याबरोबर शिकणार आहे,'' मास्तर म्हणाले.

वर्गात बसलेले सगळे त्याच्याकडं पाहत होते.

भिवानं मोठ्या गर्वानं ऐटीत पाऊल उचललं. ते आत टाकणार... तो वर्गात शिरणार... तोच मास्तरांनी त्याला अडवलं.

''थांब, आत येऊ नको. मुलांनो हा महार आहे. तेव्हा तुम्ही त्याच्यापासून लांब राहा.''

भिवाला हे नवीनच होतं आणि शिवाय भयंकर दुखावणारं, भडकवणारं, आजवर कधी कुणी असं म्हटलं नव्हतं. एवढासा अपमान केला नव्हता. तो लाडात वाढला. कौतुकात लोळला अन् इथं मात्र... संतापानं त्याचे हात शिवशिवले. ओठ थरथरले. तेवढ्यात सगळ्या पोरांनी गलका केला.

''ए शिवशील... शिवशील. आम्हाला विटाळ होईल. आत येऊ नको.''

सगळेच विरुद्ध? तो थबकला. उभा होता तिथंच चिखलात रुतल्यासारखा झाला. कर्णाच्या रथाच्या चाकासारखा.

''तू तिकडं दाराच्या बाहेर बस रे!''

मास्तरांनी बोट दाखवलं तिकडं भिवानं पाहिलं. मातीत बसायचं? आत सगळी मुलं वर्गात. कापडाच्या पट्टीवर! अन् त्याला मात्र बाहेर? तशी मातीशी त्याची मैत्री होती. खूप खेळायचा तो मातीत. मनापासून आवडायचं ते त्याला, पण तो ते करायचा आपल्या मर्जीनं. इथं तर मास्तर जसा हुकूमच देताते. केवढा पक्षपात, भिवा अवघा साडेपाच वर्षांचा.

किती आनंदानं, हुरळून शाळेत आला होता. अन् आल्या आल्याच हे असं स्वागत! ते एवढंसं पोर रडकुंडीला आलं. पण करणार काय? कारण आजूबाजूला जवळ कुणी आपलं म्हणावं असं नव्हतं. त्याला आनंदाची आठवण आली. पण तो त्याच्या वर्गात. इवल्याशा कोकराला गिधाडांनी घेरावं... तसं त्याला झालं. तो कातावला. केविलवाणा झाला. अन् मास्तरांनी बोट दाखवलं, तिथं मुकाट जाऊन बसला. धुळीत. भिवाची आयुष्यातली ही पहिली हार होती. तळहाताच्या फोडासारखे सगळे त्याला जपत आले होते. अन् इथे शाळेत मात्र सगळा उलटाच अनुभव. मातीत, वर्गाबाहेर. म्हणूनच मधल्या सुटीत आनंदा दिसताच तो धावला. भिवानं त्याला सगळं सांगितलं. आनंदा शांतपणे म्हणाला,

''हे असंच असतं. तुला माहीत नव्हतं. आम्हाला सगळ्यांना ठाऊक आहे. आपल्या लोकांना सगळीकडे बाकीचे असंच वागवतात.'' आनंदाचं बोलणं ऐकून भिवा आणखीनच दीनवाणा झाला, कारण त्यानं ठरवलं होतं, बाबांना सांगायचं, ह्या सर्वांना शिक्षा करायला लावायची. पण अपमानाची, अन्यायाची दाद मागण्याचा मार्गच नव्हता.

''तू आजवर म्हारवाड्यातल्याच पोरांत असायचास. त्यामुळं तुला अनुभव आला नव्हता. आज ह्या लोकांच्या वागणुकीनं बिथरलास, पण रोजच काही बाही होईल. सहन कर. संतापू नको. रडू नको. बदला घ्यायचं म्हणूसुद्धा नको. अख्ख्या शाळेत आपण दोघंच असे आहोत. जपून वागायला हवं. ते म्हंतील तसंच करायला हवं.'' आनंदा त्याला समजावत होता.

घरी गेल्यावर बाबांनी विचारलं. तर शाळेत मजा वाटते, गंमत येते. असंच भिवानं सांगितलं. त्याचं उत्तर ऐकून रामजींना समाधान वाटलं. खरंतर दहादा त्याच्या मनात आलं, वाटलं. बाहेर बसवल्याचं सांगावं. पण आनंदाचे बोलणे आठवले आणि जे त्यांना माहीत आहे ते कशाला सांगायचं? म्हणून तो गप्प राहिला. का कुणास ठाऊक मीराबाई मात्र म्हणाली,

''तिथं दांडगाई-पुंडाई करू नको. मारामारी करू नको रं बाबा!''

भिवा मनातल्या मनात म्हणाला, 'एकमेकांना शिवायचंसुद्धा नाही. तिथं मारामारी कशी करणार?'

'आपल्याला म्हंजे म्हारांना बाकीचे असं का वागवतात?' हा काटा त्या दिवसापासून भिवाच्या काळजात रूतला. हा पहिला घाव कधीच भरला नाही. उलट दिवसेंदिवस नव्या नव्या जखमा होत राहिल्या. चिघळत गेल्या, कधी संताप, कधी खंत, कधी दुःख वाटत राहिलं. वाढत गेलं.

घरापासून शाळा तशी लांब. परत एवढं अंतर चालत यायचं. त्यामुळंच की काय एक दिवस, दुपारी शाळेत भिवाला तहान लागली. अशी तहान लागली की, भिवाला आतली आतडी सुकल्यासारखी वाटली. वर्ग चालू असताना पोरं अधून मधून ऊठून पाणी प्यायला जायची, हे त्यानं पाहिलं होतं. तहानेनं

जीव व्याकुळ झाला. अगदीच राहवेना तसा त्यानं हात वर केला व मास्तरांना सांगितलं.

"थांब जरा." मास्तर म्हणाले.

एकदा, दोनदा, तीनदा असंच झालं. मास्तर म्हणायचे 'थांब.'

'काय ही परतंत्रता आली? पाणीसुद्धा पिऊ देत नाही.' तहानेनं अन् ह्या विचारानं चिमुकल्या भिवाचा जीव तळमळत होता. शेवटी तावातावानं तो उभा राहिला. तर त्याला उभंच राहवेना. तोलच जायला लागला. मग मात्र मास्तरांनी एका मुलाला म्हटलं,

"जारे, त्याला पाणी पाज."

पाणी पाजण्याचा अर्थ त्या संस्कारी मुलांना पटकन कळला. अन् ते सारे खि: खि: करून खिदळायला लागले.

भिवा तहानेनं व्याकुळ झालेला तरीसुद्धा कसाबसा म्हणाला, "नको माझं मी घेईन."

"अरे, तू त्या रांजणाला शिवलास, तर शाळेतल्या सगळ्यांनी काय तहानेनं मरायचं? तू बाटवलेलं पाणी आमच्या गुरांनासुद्धा चालणार नाही. आम्ही सगळे उच्च वर्णाचे. अन् तू तर नीच शूद्र."

त्याला वाटलं होतं. त्याची दीन अवस्था पाहून मास्तरांना दया आली, मदत म्हणून त्या मुलाला त्यांनी पाणी द्यायला सांगितलं. पण खरं कारण होतं शिवाशिवीचं. ते ऐकताच त्याची तहानच मेली. पण थोडा वेळ! मग त्या इवल्याशा मुलाचं शरीर आपला संताप दाखवू लागला. पाण्याची गरज भागव, म्हणून जसं टाहो फोडू लागलं.

मास्तरांनी ज्या मुलाला पाणी द्यायला सांगितलं. त्या मुलानं भिवाला पाणी द्यायचं नाकारलं. कारण घरी कळल्यावर घरचे रागावतील म्हणून. मग मास्तरांनी माळ्याला सांगितलं. नाईलाजानं माळ्यानं खूप वरून उंचावरून भिवाच्या हातावर पाणी तर ओतलं. पण पुढे दुसरीही तंबी दिली.

"नेमी नेमी नाही येणार तुला पाणी द्यायला, घरून पिऊन येत जा. नाई तं घरी गेल्यावर पी."

मग पाणी पिऊन तहान तर भागली नाहीच. पण त्या

दिवशीच्या पाण्याची चव भिवाला वेगळीच वाटली. शाळेत असताना तहान लागू नये म्हणून काय करावं ह्या विचारात तो पडला.

हे झालं पाण्याचं महाभारत, आता ऐका खेळाचं रामायण. खेळ म्हटला की सगळं विसरून तुम्ही मुलं एक होता. खरं ना? रंग, भाषा, देश, श्रीमंती, गरिबी, कुठलेही भेद वा फरक तेव्हा आड-मध्ये येत नाहीत, होय ना? पण हे आजकालचं.

तेव्हा मात्र भिवाला वेगळाच अनुभव आला. वर्गातली, शाळेतली, सगळी मुलं खेळायची. फक्त भिवा सोडून. भिवा एकूणएक खेळात तरबेज. पण त्याला यांच्यात खेळायची परवानगी नव्हती. विटाळ होईल ना त्याचा. अन् सगळ्यांना आंघोळी कराव्या लागतील. या दोषातून शुद्ध व्हायला. म्हणून त्याला खेळायला घेत नसत. तो मैदानात एका बाजूला खिन्न बसलेला. टुकूटुकू पाहत राहायचा. केविलवाणा होऊन.

क्षणोक्षणी त्याला वाटायचं. घुसावं त्यांच्यात, दाखवावं त्यांना, आपण कुठलाही खेळ किती छान खेळतो. अरे! ह्यानं असं केलं असतं तर तो बाद झाला असता. तो तिकडून गेला असता तर त्याला पकडलं असतं. अशी लाथ मारली असती, तर चेंडू तिकडे गेला नसता. वेगवेगळे खेळ पाहताना असं त्याच्या मनात येई. पण त्याचे सल्ले ऐकणार कोण? त्याच्या सूचनांनी विजय मिळवणंसुद्धा त्यांना विटाळाचेच वाटले असते. महार ना तो! त्याचं उपयोगी मार्गदर्शन पण महापापच.

ह्या अशा प्रसंगामुळे भिवाला शाळेची भीतीच वाटू लागली. नको तिथं जाणं. नको ते शिकणं. असं वारंवार मनात येऊ लागलं. बाबा जबरदस्तीनं शाळेत पाठवणार अन् शाळेतील मुलं, मास्तर, माळी असंच वागवणार, कोण काढणार ह्यातून बाहेर? कुणीच आपला तारणहार नाही. आपलंच आपण ठरवलं पाह्यजे. स्वत:च काही केलं पाह्यजे, असं भिवाच्या डोक्यात आलं. ते पक्कं झालं. आणि भिवा नावाचं एवढंसं पोरगं काही बेत आखू लागलं.

□ □ □

# ढब्बू पैशाची गोष्ट

शाळेची वेळ होत आली तरी भिवा जेवायला आत आला नाही म्हणून मीराआत्या त्याला बोलवायला बाहेर गेली. बघते तर काय? चांगली आंघोळ करून गेला होता. तरी मस्तपैकी मातीत खेळत होता. 'हा पोरगा कुणाचाच धाक मानीत नाही. दादा इथं नाही ना, म्हणून फार मोकळीक मिळालीय ह्याला. दावणीचं गुर सुटावं तसा मोकाट झालाय. दादाची नोकरी सरकारी. जा म्हटलं तिकडं जायलाच पाह्यचे त्याला. मी, आनंदा, तुळसा, मंजी कुणी ह्यांच्यावर रागावलो की अशा गंमती जमती करतो हा पोरटा की आमचा राग, संताप पळूनच जातं सारं. अन् हसूच फुटतं आम्हाला. दादापुढं मात्र नाही ह्याच्या गमत्या चालत. फक्त त्यालाच घाबरतो.'

मीराबाई भिवाला खेळताना पाहत मनातल्या मनात म्हणत होती. तिनं विचारांना आवर घातला अन् भिवाला प्रेमानं बोलावलं. ''भाकरी खायला ये रे सोन्या.'' असं पटकन ऐकेल? अन् तेही लाड करणाऱ्या आत्याबाईचं? मग तो भिवा कसला? गोडगोड बोलून ती कंटाळली अन् वैतागानं ओरडली,

''भिवड्या! शाळेत गेला नाहीस मेल्या तर मी उपाशी राहीन. सांगून ठेवत्ये. मग मनधरणी नको करू माझी.''

आई गेल्यावर ह्या पांगळ्या बाईनंच त्याला आईची माया-ममता दिली. कुणी मारायला आलं, कागाळ्या घेऊन आलं, भांडायला आलं मग ते घरचं वा बाहेरचं, कुणी का असेना की, भिवा तिच्या मागं लपायचा. तीही दरवेळी त्याला पाठीशी घालायची. त्याचा कैवार घ्यायची. ह्या बाबतीत ती रामजीचंही ऐकत नसे. अन् त्याचंही तिच्यापुढं काही चालत नसे. भिवाचंही तिच्यावर खूप खूप प्रेम होतं. आपण उपाशी राहायची धमकी दिली की,

भिवा नीट वागतो, सांगू ते करतो. हे मीराबाईनं ओळखलं होतं. म्हणून ती हा रामबाण उपाय योजी. पण कधी कधीच हं!

आत्ताही तिची धमकी ऐकताच भिवा पळत आला. त्यानं तिच्या गळ्याला मिठी मारली. अन् लाडात म्हणाला,

"भूक आजिबात नाही बय... तसाच जातो."

"आजकाल तू हे काय चालवलंय रे? बघावं तेव्हा शाळेत जायची टाळाटाळ करतोस."

"जातोय की." तो चिडून म्हणाला आणि कोपऱ्यातलं दप्तर घ्यायला गेला पण तिथंच उभा राह्यला अन् ओरडला, "हे काय? माझं दप्तर कुणी विस्कटलं? मंजिटले तू? का तुळशीटली नं?"

"ए आम्ही नाही हं." दोघी बहिणी एकाचवेळी म्हणाल्या.

"भिवा, मोठ्या बहिणींशी असं बोलतात का रे? आणि त्यांच्यावर कशाला आळ घेतोस? शाळेतून आल्यावर दप्तर फेकतं कोण? तूच ना? कधीतरी नीट ठेवतोस का? एकदा तरी खुंटीला अडकवतोस का?" मीराबाईनं विचारलं.

"हा.. हा.. माहीते माहीते. बायका बायकांचाच कैवार घ्यायच्या." तो पुटपुटला.

"एय् मर्दा... मुकाट शाळेत जा आता." बहिणींनी चिडवलं.

"कुठं दुसरीकडं जाऊन बसू नको रे बाबा" जाणाऱ्या भिवाला मीराबाईनं ताकीद दिली.

'आत्या असं का बरं म्हणाली?' घराबाहेर पडल्यावर भिवा चालताना विचार करीत होता. 'तिला कळलं तर नाही? पण सांगेल कोण? छे, एकाही पोराची हिंमत नाही. घाबरतात जाम सगळे मला! पिट्ट्या पडेतो पिटून काढीन, पाहतात ना ते!' भिवा खरंच फार युक्तीबाज होता. बरोबरीच्या, लहान्या मुलांशी तो झोंबाझोंबी करायचा. अंगानं सशक्त अन् मारामारीत तरबेज. त्यामुळं त्यांना तो सहज लोळवायचा. शरण यायला लावायचा. मात्र आपल्यापेक्षा वयानं मोठ्या, अंगापिंडानं दणकट बलवान पोरांच्या अंगाशी झटायचा नाही. त्यांच्याजवळ जायचा सुद्धा नाही. लांबूनच त्यांना दगड मारायचा. भिवाच्या अचूक नेमानं, ते बिचारे बेजार व्हायचे, हरलो म्हणायचे.

भिवा दप्तर घेऊन निघाला. पण त्याला शाळेत जावंसंच वाटत नव्हतं. जायचंही नव्हतं. दोन-तीन दिवसाआधी असाच कंटाळा आला होता. इकडं तिकडं भटकत त्यानं बराच वेळ काढला. पण दुपारी भूक लागली! अशी लागली अशी लागली एकदम कडक! आवरेच ना! काय करावं? मधल्या सुट्टीत जेवायला आलो असं दाखवीत घरी जावं तर दप्तर कुठं ठेवावं? ह्याला प्रश्न पडला. फिरता फिरता एका अंगणात फोडीव लाकडांचा ढीग दिसला. तिथल्या बाईला त्यानं विचारलं,

"लाकडं फोडून देऊ का?"

"दे. खायला भाकरी देईन." तिच्या उत्तरानं भिवाला भूक भागवायच्या कोड्याचंच उत्तर मिळालं.

"पण तू फोडू शकशील? लहान दिसतोस." तिनं त्याच्याकडं पाहून म्हटलं.

भिवाच तो! महा हजरजबाबी. प्रत्येक शंकेला त्याच्याकडं उत्तर कसं तयार असायचं. झटकन् म्हणाला,

"बाई, एवढीशी मुंगी केवढं मोठ्ठं वारुळ बांधते. माणूस किती थोर! त्याला अळीएवढा ढेकूण सहज डसतो. हैराण करतो."

त्याचं बोलणं ऐकून हा लाकडं फोडणार, बाईची खात्री पटली. ती भाकरी आणायला आत गेली. लाकडं फोडल्यावर भाजी भाकरी खाताना भिवाला वाटलं, 'हे तर फारच चांगलं! काम करायचं, खायचं, मिळवायचं. एवढंच कशाला मोलमजुरीवर पैसेही मिळवता येतात. नकोच ती शाळेची कटकट! त्यापेक्षा सरळ कुठं कामाला लागावं! पण इथं काम कसलं मिळणार? कोण देणार? अन् तेही नेहमी नेहमी. हा नाहीतर असंच करावं. जो तो म्हणतो आपण ऐकलंय ना. स्वत: आपल्या दोन कानांनी. मुंबई फार चांगली! तिथं कुणी उपाशी नाही राहत. प्रत्येकाला काम मिळतंच मिळतं! चला मुंबईलाच जावं. पण जायला पैसे? बयच्या पिशवीत असतात. जेव्हा तेव्हा, ह्याला त्याला ती पिशवीतून काढून पैसे देते. पुष्कळ पैसे असावेत म्हणून तर पिशवी सदा कमरेला लावते. कधी इकडं तिकडं ठेवीत नाही. झोपतानासुद्धा तशीच खोचलेली. आपण तिच्याकडे पैसे मागायचे, नक्की देईल ती. कारण कधीच मला कशाला नाही म्हणत नाही. पण सतराशे

साठ चौकश्या करील अन् मुंबईचं कळल्यावर काय जाऊ देईल? रडेल, ओरडेल, उपदेश करील. त्याऐवजी... रात्री गुपचूप तिच्या पिशवीतून पैसे घेतले तर? तोच एकुलता एक मार्ग आहे.' असं मनात येऊन आजवर भिवानं कधी केलं नव्हतं ते करायचं ठरवलं. म्हंजे चोरीच. मुंबईला जायचं ठरवल्यानंतर त्याच्या मनात आलेले सगळे विचार संपले. हा बेत पक्का केला अन् भिवाला खूप शांत शांत वाटलं. त्याची बेचैनी गेली. मनातली खळबळ विरघळली.

घरी आल्यावर तो सर्वांशीच गोडीनं वागला. रात्री झोपताना नेहमीप्रमाणे तो आत्याच्या कुशीत शिरला. तिच्या अंगावर पाय टाकला. अन् झोपायचं छान सोंग केलं. आत्या मात्र खरंच गाढ झोपलीय अशी खात्री झाल्यावर भिवानं हळूच तिच्या कमरेची पिशवी काढली. ती घेऊन तो बाहेर गेला. तिच्यात हात घातला. रुपायाएवढं नाणं आहेसं वाटलं, त्याला इतका आनंद झाला. ते त्यानं पिशवीतून काढलं आणि ढळढळीत उजेडाचा एकदम काळा गोळा व्हावा, तसं झालं. बत्तीच्या मिणमिणत्या प्रकाशात नाण्याचा रंग पांढरा नाही, तांबूस आहे. त्याला स्वच्छ दिसलं. म्हंजे तो रुपाया नव्हता, ढब्बू होता. ढब्बू म्हंजे दोन पैशाचं नाणं. ते तांब्याचं असायचं. अन् रुपाया चोख चांदीचा. आता कसचं काम? कसची कमाई? सातारहून मुंबईला ढब्बू पैशात थोडंच जाता येणार? क्षणात आशेची निराशा झाली. त्याला इतकं इतकं वाईट वाटलं, रडायला आलं. तो भराभरा आत गेला. आत्याची पैशाची पिशवी तिच्या कमरेला जमेल तशी खोचली अन् जोरात ढुशी मारल्यासारखा तिच्या कुशीत शिरला. त्या धक्क्यानं तिची झोप जराशी चाळवली. तिनं भिवाभोवती हाताचा विळखा घालीत त्याला जवळ घेतलं, थोडं थोपटलं, भिवा तिला बिलगला. मिराबाईच्या मायेच्या गाभाऱ्यात गेला अन् सगळं सगळं विसरला. लागलीच गाढ झोपला.

ढब्बूनं खरंच केवढी कृपा केली. जर का तो रुपाया असता तर? रामजी आंबावडेकरांचा भिवा फक्त स्टेशनातला हमाल, गिरणीतला वा कारखान्यातला कामगार झाला असता, मुंबईला येऊन! खूप लोक म्हंतात, होतं ते चांगल्या करताच. ते कधी कधी असं खरं ठरतं. पाह्यलं ना?

□ □ □

# शिदनाका बरोबर

आज रविवार! शाळेला सुट्टी म्हणून शाळेत न जाणाऱ्या मुलांना खूप खूप अगदी भयंकरच आनंद झाला होता. ए हसताय काय? मी बोलत्येय. त्यात जराही चूक नाही. कळलं तर तुमचीच फ होणार. सांगू? ऐका तर मग ही सगळी मुलं होती भिवाची दोस्त मंडळी म्हंजे...

...म्हारवाड्यातली मुलं. ते कुणीच शाळेत जात नव्हते. जायचा फक्त एकटा भिवाच! अन् तो तर ह्या सगळ्यांचा खूप आवडता. प्रत्येक बाबतीतला त्यांचा म्होरक्या! तो नसला की त्यांना खेळावंसंच वाटत नसे. खेळलं तरी मजाच येत नसे. पहिल्यांदा भिवा म्हारवाड्यासमोरच राहत होता. पण नंतर त्याच्या वडिलांनी म्हंजे रामजी सुभेदारांनी दुसरीकडे एक बंगला भाड्यानं घेतला. भिवा आता राहायला पण लांब गेला होता. शिवाय शाळेतही जात होता, म्हणून रोज खेळायला येत नव्हता. आज त्याची शाळा बंद.

आज तो खेळायला येणार म्हणून सगळे हुरळले होते. भिवा आला अन् मग तर काय ते सारे लंगोटीवाले नाचायलाच लागले. 'भिवा ऽऽ भिवा' करत त्याच्याभोवती जमा झाले. नंतर मग सगळे मिळून खेळू लागले.

सूरपारंब्या, आट्यापाट्या, लंगडी, शिवाशिवी, छपाछपी. सगळेजण कित्ती कित्ती खेळ खेळले त्या दिवशी! जेव्हा दुपार झाली, जेवणाची वेळ होऊन गेली होती. भिवा घरी जायला निघाला. त्या सगळ्यांना खूप वाईट वाटलं. भिवाचाही खरंतर तिथून पाय निघत नव्हता. शाळेत जात नव्हता, तेव्हा दिवसभर सगळे एकत्र असायचे. भिवा विद्यार्थी झाला अन् सगळंच संपलं.

म्हारवाड्यातील पोरं पण दुःखी तीही हळहळायची. ते म्हणायचे, 'भिवा, शाळेतल्या गंमती जमती सांग.' भिवा काय सांगणार? शाळेत तर ना कुणी त्याच्याशी बोलायचं. ना त्याला खेळात घ्यायचं, नुसता त्याचा धक्का लागला, चुकून तरी केवढं पाप, केवढा भयंकर गुन्हा! भिवाला मग इतकी बोलणी खावी लागत! परत उत्तर द्यायचं नाही. हे सगळं तो आपल्या त्या लहानपणाच्या सोबत्यांना कसं सांगणार? मान सांगावा जनात, असं बय नेहमी शिकवायची ना. खरंच ह्या मुलांच्यात तो कित्ती सुखी होता. आनंदी होता. पण शाळेत? सगळंच विपरीत!

भिवा घरी जायला निघाला. तसा शिदनाक त्याच्याबरोबर आला. दोघे चालले होते. तसा मध्येच शिदनाक म्हणाला,

"भिवा, गड्या तू शाळकरी झालास आणि आम्हाला तुटलास. आत्ताच इत्का दूर दूर गेलास."

"नाही... नाही... तसं कधीच होणार नाही. अरे, तुम्हाला भेटलो की मला फार बरं वाटतं. तुमच्यात खेळलो की खूप आनंद होतो. मी तुमच्यातला आहे. अन् नेहमी तुमच्यातलाच राहीन." भिवा कळवळून म्हणाला. शिदनाक थोडा वेळ गप्प बसून एकदम म्हणाला,

"आज माझ्या घरी येतोस? चल ना.. मला लय बरं वाटंल." शिदनाक इतक्या काकुळतीनं म्हणाला. भिवाच्यानं नाही म्हणवेना. तो त्याच्याबरोबर महारवाड्यात शिरला.

भिवा प्रथमच महारवाड्यात येत होता. त्यामुळं जे जे त्याला दिसत होतं. त्याचं अजबच वाटत होतं. अन् धक्काही बसत होता. तिथली नागडी, घाणेरडी मुलं. फटकुरं नेसलेल्या बाया. फक्त लंगोट्या लावलेले उघडे वाघडे पुरुष! आणि ती मोडकी, ताडपी खुराड्यासारखी घरं!

शिदनाकाच्या घरातही स्वच्छता अजिबात नव्हती. फाटकी पांघरुणं. चिंध्या झालेल्या गोधड्या. दारिद्र्याचा भयानक धूरच धूर तिथं कोंडलेला! भरलेला होता! एका तुटक्या टोपलीत सतरा प्रकारच्या भाकऱ्यांचे वाळलेले तुकडे. तरी त्यांवरच शिदनाकाची लहान भावंडं तुटून पडत होती. एकमेकांच्या हातांतले तुकडे खेचीत होती. भांडत होती. रडत होती.

"ये रं भिवा. ये बाळा ये." भिवाला पाहताच शिदनाकची माय ममतेनं म्हणाली.

"आमच्या ह्या घरात तुला बस तरी कुठं म्हणू? तू थोरामोठ्याचा मुलगा."

चिल्यापिल्यांची भाकरीच्या तुकड्यांची ओढाओढ, भेकणं, किंचाळणं आणखी वाढलं होतं. भिवाच्यानं ते पाहवत नव्हतं. म्हणून दुसरं काही न बोलता, सरळ त्याच बाईला त्यानं बोलून टाकलं,

"बय तुझी लेकरं खाण्यासाठी मांजरीसारखी भांडताते. त्यांना भाकरी का नाही देत?"

"दिल्यात न्हवं ते तुकडं! टोपलीच ठेवलीया त्येंच्यापुडं!" शिदनाकाची आई म्हणाली.

"अग, पण बघ ना. तेवढे पुरे नाहीत. थापून देना त्यांना आणखी भाकरी?"

"भाकरी आणखी? थापून? आमच्याकडं पीठ-मीठ काई नसतंया राजा."

आपल्या बोलण्यानं भिवाचा चेहरा गोंधळात बुडालेला तिला दिसला. तिच्या लक्षात आलं. म्हणून समजावण्याच्या सुरात ती म्हणाली,

"तुला म्हाईत न्हाई जनु लेकरा. आरं आम्ही म्हारं. म्हारकीवाली म्हारं. शिळंपाकं, तुकडे ताकडे गावातून मागून आणतो. त्यानंच पोट भरतो. आज यवढंच तुकडं मिळालं. आता मी अन् शिदनाक न्हाऊ उपाशी. पोरं तेवढं खातील. गटागटा पानी पितील. पुष्कीळदा पान्यानंच पोट भरावं लागतं पोरांना. मंग झोपतील. उटली की भूक गायब. बरं का भिवा, पान्या परमानं झोप पन आमची भाजी भाकर!"

हे ऐकून भिवावर जसा डोंगरच कोसळला.

"पण बय असं का?" तो कसंतरी म्हणाला.

"त्ये नाय म्हाईत. असंच हाय. यवडं खरं. आजवर चालत आलंय. फुडं भी तसंच न्हाईल."

"आमच्या घरात आमची आत्ये, माझ्या बहिणी रोज सैंपाक करतात. भाजी भाकरी बनवितात."

''आम्हाला नाय बाबा घरात भाकरी करता येनार. तशीच रीत हाये. आजवरचं ह्ये वळण मोडलं तर आता उपासानं मरतोय. मंग तर लोक जीवानिशी ठार करतील. आमाला कितीही काम केलं तरी पैका नाय देत कुनी. बदल्यात फक्त शिळंपाकं, धड्डुतंच देत्यात. तशी चूल तं आमच्याकडं पण पेटती रे बाबा. लई कडक तुकडं असलं तर पाण्यात टाकून शिजवायला. नाईतं मेलं ढोरं वढून आणतो, त्याचं मटण करायला.''

हे सगळं ऐकून हळूहळू भिवाला चीड यायला लागली.

''तुम्ही आम्ही एकच ना ग? मग असं का?''

''तुम्ही म्हारं, आम्ही म्हारं. मंजी एकातलेच. ह्ये खरं. पन तरी तुमच्या-आमच्यात जमीन अस्मानीचा फरक! राजा! तुझ्या घरात तुजा आजा शिकला. मिलट्रीत गेला. तुजा बाबा शिकला. मिलट्रीत गेला. तुज्या आईचा बाप, चुलत भाऊ शिकले; मिलट्रीत गेले.''

''आमच्या सगळ्या लोकांना तू ओळखतेस बय?'' भिवाला खूप आश्चर्य वाटलं.

''मीच काय? सारी जात जान्ती. आरं, तुमच्या सारकं शिकलेलं आपल्यात मूठभरच! शिकषाण! शिकषाण घेतलं. म्हणून तुमचं जिणं बाग मळ्यांसारखं फुललं. हिरवंगार झालं. आमी अडानी राह्यलो. अन् घाणीच्या गटारी झालो. तू शाळंत जातोस. लय ब्येस करतोस. शाळा सोडू नगं. शिकनं टाकू नगं. ही जादूची दोरी हाय बाळा! तिच्यावं चालून सुखाच्या स्वर्गात, म्हालांत जाशील. माझ्या शिदनाका सारका शिकला नाईस... तर ह्या अशा नरकात ऱ्हावं लागलं. भीक मागून तुकडं आणायचं. ते खाऊन मरं पावतं कसं तरी जगायचं. वाण्या-बामणांची समदी वंगाळ कामं करायची. पोरांनी, मोठ्यांनी! तरी ना पुरतं पोटाला. ना पांघरायला. जनावराची जिंदगी आमच्या परीस ब्येस! अशी गत करून घिऊ नको, तू आपला. लय लय शीक!''

शिदनाकाची आई भडाभडा ओकावं तशी बोलली.

भिवा घरी आला. पण कुणाशीच बोलला नाही. एकदम तो गप्प गप्पच! हे असं पहिल्यांदाच झाले. म्हणून घरातल्या सर्वांना कसंसंच वाटलं.

थोड्या वेळानं आणखी एक नवल घडलं. जेवल्यावर तो चक्क अभ्यासाला बसला. आता मात्र सगळेच आश्चर्यचकित झाले. बरं हे त्याचं, सोंग-ढोंग-नाटक नव्हतं वाटत. पण काय झालं? त्याला विचारणार कोण? कारण तसा तो खूप तापट! शेवटी मीराबाई त्याच्याजवळ गेली. बसली. पाठीवर मायेनं हात फिरवीत म्हणाली,

"आज सुटीच्या दिवशी अभ्यासाला कसा लागलास बाबा? जा खेळायला जा."

तट्ट फुगलेला फुगा टाचणी टोचल्याबरोबर फुटावा तसा मीराबाईच्या ममतेनं त्याच्या गुपचिळीचा बांध तोडून टाकला. त्यानं सगळं सगळं सांगितलं. शाळेतला त्रास. शाळा चुकवून भटकणं. मुंबईला जायचा विचार. तिची पैशाची पिशवी काढणं. शिदनाकाच्या घरातलं.

एकूण एक ऐकल्यावर मीराबाईनं त्याला गोंजारलं. पोटाशी धरलं. अन् समजुतीच्या सुरात म्हणाली,

"तुझा बाप अन् मी शिकण्यासाठी म्हणूनच तुला येताजाता जाच करतो. कारण शिक्षणच आपली मजबूत काठी! तिच्यानंच आपल्यावर जुलूम करणाऱ्याला वठणीवर आपण आणू शकतो. तिच्या आधारानंच, आपल्या जगण्याची, खाचखळग्याची वाट धडपणं चालू शकतो. जाळात जितकं जितकं जास्त जळतं, तितकं सोनं लखलखतं, बरं बाबा. आता जेवढे अपमान सोसतोस. तेवढं नाही, त्यापेक्षा अधिक मान मरातब तुला पुढं मिळतील आणि शिक्षणामुळंच. नीट ध्यानात ठेव."

"बय, माझं चुकलंच होतं. आता मात्र मी निश्चय केलाय. कितीही छळ होऊ दे. वाट्टेल तेवढी संकटं येऊ दे. उपाशी राहीन. कुठलेही कष्ट करीन. पण शिक्षण सोडणार नाही." भिवा म्हणाला.

"अशी ईर्ष्या धर माझ्या वासरा. आशा सोडू नकोस. म्हंजे अंगात हिंमत येते. सोसायचं बळं वाढतं. जिथं पोचायचं तिकडं ध्यान लाव. म्हंजे काट्यातून चालताना घायाळ होणार नाहीस. तुझी चाल पण धिमी पडणार नाही."

आपल्या बयचा हा बहुमोल सल्ला भिवानं सदैव पाळला.

कितीही अडथळे आले. तरी शिक्षण सोडलं नाही, कारण शिक्षणानं नवी दृष्टी येते, स्वाभिमान जागृत होतो. आपल्या हक्काची जाणीव होऊन त्यासाठी लढण्याची, ते मिळवण्याची जिद्द येते. म्हणूनच ते स्वत: ज्ञानाचा सागर झालेच. पण आपल्या बांधवांनाही बाबासाहेबांनी शिक्षणाच्या प्रेरणेनं पेटवलं.

□ □ □

# आंबेडकर कसे झाले?

''का रे भिवा, आजकाल मधल्या सुट्टीत तू घरी येत नाहीस भाकरी खायला?'' भिवा सकाळी शाळेत निघाला तेव्हा मिराबाईनं काळजीनं विचारलं. ''उपाशीतापाशी राहू नये राजा. हे तुझं खायचं प्यायचं वय. तुझ्या शाळेपासून आपलं घर खूप लांब. म्हणून कंटाळा येतो का भर दुपारी यायला?''

''अँ हँ... उलट मजाच वाटते. अगं, रमत गमत यावं, जाताना पण मनाला येईल तिथं थांबत थांबत जावं.''

''पाय दुखतात? ऊन लागतं? थांबत थांबत का रे जातोस? नीट आडोशाला, झाडाच्या सावलीला, विसावा घेतोस ना?''

''तसलं काही नाही बय. कुठं पोतराज पाहत उभा राहतो. कुठं भांडण चाललंय, ऐकत बसतो. अगं, तेवढाच वेळ बाहेर काढता येतो. शाळेत कमी बसावं लागतं. बाकीच्या मुलांपेक्षा माझी मधली सुट्टी भली मोठी. मीच करून घेतलेली. हां शाळेनं नाही दिलेली.'' भिवा ऐटीत सांगत होता.

''असा उशिरा वाटेल तेव्हा जातोस? तुझे मास्तर ओरडत - रागवत नाही तुला?'' मीराबाईनं आश्चर्यानं विचारलं.

''रागवायला, ओरडायला ते शाळेत असतात कुठं? नसतातच पुष्कळवेळा!''

''मग शिकवतं कोण रे तुम्हाला? मास्तर तर शाळेत येत नाही?''

''ते शाळेत येतात गं. पण तरीही शाळेत नसतात.''

''भिवा उखाणं घालू नको. नीट सांग. खरं बोल.''

''शाळा सुरू झाली ना बय, की सकाळी मास्तर वर्गात येतात. आमच्या वर्गातल्या रहीमतुल्लाला सांगतात, मुलांवर नीट

लक्ष ठेव. वर्ग चांगला सांभाळ. अन् जातात निघून!''

''का रे? आजारी आहेत वाटतं! घरी जात असतील. आराम करायला.''

''छ्याँ! आजारी नाहीत. घरी पण जात नाहीत!''

''मग जातात तरी कुठं?''

''शाळेसमोरच्या दुकानात. तिथले हिशोब लिहायला!''

''जात असतील कधीमधी. तू कशाला एवढी दवंडी पिटतोस?''

''अग बय रोज जातात. न चुकता.''

''अयाई ग! मग तर काही खरं नाही. त्या पोराचं काय नाव म्हणालास?''

''रहिमतुल्ला.''

''हां त्या रहिम्याचं. अरं तू असा एक दांडगा! तुझ्यासारखे कितीक असतील तुझ्या वर्गात? एवढ्या भुतांना आवरता आवरता भुस्कट पडत असंल त्याचं. तो बिचारा तुमच्या एवढाच.''

''अं.. हं.. अं..हं. आमच्या एवढा नाही तो. अगं, आम्ही सगळे दहावर्षांच्या आतबाहेरचे. रहिमतुल्ला आहे तिशी-पंचविशीचा.''

''आं? म्हंजे बाप्याच म्हणायचा.''

''हो.. ना.. आमच्या दुपटीतिपटीच्या वयाचा. त्यामुळं मुलं ऐकतात त्याचं. ऐकावंच लागतं गं. कारण रोज शाळा सुटायच्या आधी मास्तर वर्गात येतात आणि त्याला विचारतात, काय रे पोरांनी गडबड केली का? कुणी गडबड केली? मास्तर परवडले. पण हा नको. असंच वाटतं, सगळ्यांना. पक्का खवीसे.''

''अशा ह्याच्यात शाळेत शिकवणं होतच नसेल.''

''नाही होत ना. पण बय तरीसुद्धा आमच्या मास्तरांना उत्तम शिकवण्याचा शेरा अन् शाबासकी मिळते दरवर्षी. कशी सांगू? हे बघ. परीक्षा घ्यायला डेप्युटी येतात. आम्हाला गणित घालतात. मास्तर शेजारच्या खोलीतून आम्हांला पाटी दाखवतात. तिच्यावर मोठ्या ठळक अक्षरात त्या गणिताचं उत्तर लिहिलेलं असतं. ते आम्ही आमच्या पाटीवर लिहितो.''

''मास्तरानं लिहिलेलं उत्तर म्हंजे ते चूक नसनारच!'' मीराबाई म्हणाली.

''नसतंच मुळी. आम्ही सगळ्यांनी असं अचूक बरोबर उत्तर

लिहिलं की मग काय? अख्ख्या वर्गात एक पण नापास नाही होत. अशी आहे, आम्ही सगळे पास होण्याची मज्जा.''

''भिवा, कसा रे तुझा हा मास्तर? शाळेचा पगार खातो. दुकानाचा पण खातो. अरे, तू शिक्षणात हुशार व्हावा, खूप शिकावा, अशी आमची इच्छा. असा हा न शिकवणारा मास्तर तुला मिळाला. म्हंजे आता....''

''हां... हा. बय. माझ्या मास्तरांबद्दल वाईट बोलू नको. फार चांगले आहेत ते. खूप खूप प्रेम आहे त्यांचं माझ्यावर. बाप रे! उशीर झाला बघ तुझ्याशी बोलत राह्यलो तर. जातो मी.. शाळेत....''

''अरे पण... मधल्या सुटीतल्या भाकरीचं काय?''

''ते आमचं गुपित आहे. सांगेन मग.'' म्हणत भिवा पळतच सुटला आणि धापा टाकीतच शाळेत पोचला. मास्तर दुकानात गेले असावेत. कारण नेहमीप्रमाणे रहिमतुल्लाच वर्ग सांभाळीत होता.

भिवा वर्गाच्या बाहेरच बसायचा. त्यामुळं तो उशिरा आला तरी काही बिघडत नसे. वर्गातल्या शिस्तीला इतकासाही धक्का पोचत नसे. इतरांच्या संगतीनं रहिमतुल्ला पण शिवाशिव पाळायचा. त्यामुळं वर्गातल्या बाकीच्या मुलांसारखा त्याच्याकडनं भिवाला पाठीत गुद्दा मिळत नसे. इतकंच काय रहिमतुल्ला ना त्यांच्या कानाखाली आवाज काढायचा. त्यांना श्रीमुखात द्यायचा. महार असल्यामुळं भिवाचा हा असा फायदाच व्हायचा. छडीच्या बाबतीत म्हणाल तर, शाळेच्या सुरुवातीच्या दिवसांत, शरीरावर वेगवेगळ्या ठिकाणी भिवानं छडीबाईला पुष्कळ वेळा पडू दिलं होतं. नंतर खेळातली चकवाचकवी, हूल देणं कामी लावलं. अन् छडी चुकवण्यात भिवाबाळ एकदम तरबेज झालं होतं. थोडक्यात भिवाला रहिमतुल्लाचा छडी इतकाही नव्हे काडी इतकाही त्रास नव्हता.

मधल्या सुट्टीची घंटा वाजली. भिवानं आतुरतेनं कान टवकारले. अपेक्षेप्रमाणं बाजूच्या खोलीतून मास्तरांची हाक आली.

''भिवा इकडं ये.''

भिवा वाटच पाहत होता. लागलीच गेला.

मास्तर डबा उघडून बसले होते. म्हणाले, ''बैस... अरे! किती लांब! पोळी म्हंजे काय चेंडू आहे? इतक्या लांबून कशी

फेकू?''

भिवा पुढं सरकला. जरासा जवळ आला.

''गधड्या. इतक्या नजीक येऊ नको. शिवशील ना. जरा दूर बैस. हं दोन्ही हात पसर. खाली कर रे बाबा. मी बरोबर तुझ्या ओंजळीत टाकतो.''

''तुम्ही कसंही टाका मास्तर. मी बरोबर झेलतो. हं... इकडं तिकडं मुळीच सांडू, पडू देणार नाही.''

''हो ना. नाही तरी तसा तू चांगला खेळाडू!'' म्हणत त्यांनी आधी पोळी, मग भाजी टाकली आणि आपल्या तोंडात घास घालीत म्हणाले, ''खुळ्या बघतोस काय? खा. भूक नाही का लागली?''

काही दिवसांपूर्वी मास्तरांच्या लक्षात आलं होतं. भिवा मधल्या सुटीत घरी जातो. बाकीच्या मुलांप्रमाणं तो डबा का आणीत नाही, सकाळी शाळेत येताना? त्यांच्या मनात आलं. त्यांनी भिवाला तसं विचारलं,

''आमचं जेवण खूप निराळं. मला आवडणारी बोंबलाची चटणी किंवा मटण, भाकर इथं आणली तर.. अख्खी शाळा विटाळली, असं जोतो म्हणेल. दुसरं म्हंजे घाण वास येतो, म्हणून मुलं नाकं दाबतील. माझ्या जेवणाला शी: शी: म्हंतील. माझी टिंगल करतील.''

त्याचं म्हणणं खरं होतं. हे एवढंसं पोरगं उन्हापावसांत एवढ्या लांब चालत जातं. म्हणून त्यांना वाईट वाटलं.

''उद्यापासून मी तुला खायला देईन. घरी जाऊ नको.'' मास्तर म्हणाले. बोलल्याप्रमाणं दुसऱ्या दिवसापासून मास्तरांनी रोज त्याला आपल्या डब्यातलं जेवण द्यायला सुरुवात केली. हे असं बोलवून. जवळ बसवून.

दरवेळी भिवाला हे सगळं आठवे. अन् भिवाचं मन भरून येई. मास्तरांनी प्रेमानं-आपुलकीनं दिलेली पोळी, भाजी, भाकरी बघतच राहावी; असं वाटे त्याला. तेवढ्यानंच त्याचं पोट गच्च भरे! कुणी जवळसुद्धा येऊ देत नाही आपल्याला. आपण महार म्हणून. पण हे ब्राह्मण... आपले मास्तर. तर स्वत:हून बोलवतात. डब्यातलं खायला देतात. तेसुद्धा किती प्रेमानं! भिवा गप्प गप्प

पाहून मास्तरांनी म्हटलं,

"मधली सुट्टी म्हंजे शाळेतून सुटका. भटकायला मोकळीक! हे मी तुझं बंद केलं म्हणून नाराज तर नाहीस ना रे?"

"मुळीच नाही. अगदी अजिबात नाही. उलट केवढं माझं मोठ्ठं भाग्यच समजतो मी. तुम्ही जवळ बसू देता. खायला घालता. खूप उपकार वाटतात मला. किती चांगले आहात तुम्ही! हे शिवाशिवीचं आहे म्हणून. नाहीतर खरं म्हणजे तुमचे पायच धरावेसे वाटतात मला."

"तू पण चांगला आहेस रे! निराळा आहेस. तुमच्या जातीतल्या इतरांसारखा ओंगळ - मेंगळट नाहीस. स्वच्छ! तरतरीत! टापटिपीचा आहेस. आवडतोस बरं का मला तू आंबावडेकर... तुझं आडनाव असं कसं रे? खूप चमत्कारिक आडनीड वाटतं!"

"पूर्वी आमचं आडनाव होतं संकपाळ." भिवा सांगू लागला.

"ते केव्हा बदललं, कुणी बदललं, का बदललं. कुणास ठाऊक! आमचं मूळ गाव आंबावडे! कोकणात दापोलीजवळ आहे. आमचं आत्ताचं आंबावडेकर आडनाव त्यावरूनच झालं असावं."

"बदलून टाक ते. म्हणायलासुद्धा कसंसंच अवघड वाटतं."

"मुलंही चिडवतात मला - म्हंतात, भिवड्या आंबावडीकर. आंबा वडी कर."

"माझं बघ कसं सुटसुटीत आहे. आंबेडकर."

"हो ना. पण माझं बदलता येईल?"

"का नाही? मी बदलतो ना. माझ्या हातात आहे. रजिस्टर मध्येच लिहून टाकतो."

"पण दुसरं कुठलं घेणार?"

"अं..., माझंच घे. आंबेडकर. तुझ्यात थोडासा फेरफार फक्त करावा लागेल."

"खरं? खरं? खरंच म्हणता मास्तर?" भिवाला इतका आनंद झाला. अगदी नाचावंसंच वाटलं. 'मास्तरांचं आपलं आडनाव एकसारखं झालं तर! केवढी अभिमानाची गोष्ट! आपल्यावर किती किती माया मास्तरांची. आपल्याला प्रेम देतात. खायला देतात. आता आडनावही देतो म्हंतात.'

"ठरलं तर. कॅटलॉगमध्ये लिहितो. ह्यापुढं तू आंबावडेकर

नाही. आंबेडकर. काय? आंबेडकर असंच लाव आतापासून.''

आंबेडकर मास्तर बोलल्याप्रमाणेच करणारे होते. त्यांनी भिवाचं नाव आंबेडकर लावले. तसंच पुढं लागत गेलं.

मास्तरांनी त्यांचं आडनाव देऊन आपल्यावर खूप उपकार केले, असं त्यावेळी भिवाला वाटलं. पण असं करून आपण आपलं आडनाव अजरामर करतोय, हे मास्तरांनाही तेव्हा कळलं नव्हतं. बाबासाहेबांनी आपल्या गुरुजींच्या आडनावाला सन्मान मिळवून दिला. एकापरीनं गुरूचं ऋणच त्यांनी फेडलं. आपल्या ह्या मास्तरांबद्दल ते खूप आदरानं बोलत. खूप कृतज्ञता दाखवीत. तुम्हीही आपल्या बाई-सरांबद्दल तसंच करता, मला माहीत्ये!

□ □ □

# वडिलांकडे - गोरेगावला

झुक झुक झुक. कुऽऽऽक कुक कुक.

आत्याला मात्र टुक टुक टुक.

भिवाच्या पुढारीपणानं घरातली पोरं नाचत होती. गात होती. बयला हा आनंदोत्सव कशामुळं कळेना. शेवटी ती ओरडली,

''अरे, हा धिंगाणा कसला चाललाय?''

''बाबांचं पत्र आलं. बाबांचं पत्र आलं.'' भिवानं तालातच उत्तर दिलं.

रामजी सध्या गोरेगावला कामाला होते. पण बिऱ्हाड त्यांनी साताऱ्यालाच ठेवलं होतं. कारण भिवा, आनंदा हायस्कूलमध्ये शिकत होते. घरापासून दूर तरी रामजींचं घारीसारखं लक्ष पिलांपाशी! म्हणून ते वारंवार पत्र पाठवीत. मीराबाईला हे माहीत होतं. म्हणूनच पत्र आल्यावर उधळायचं, गाणं म्हणायचं काय कारण? तिनं तसं म्हटलं. अन् कळलं. हे पत्र विशेष होतं. रामजींनी मुलांना उन्हाळ्याच्या सुट्टीत गोरेगावला बोलावलं होतं. नवे कपडे करण्यासाठी पैसेही पाठवले हाते. ह्याचंही तितकंसं अप्रूप नव्हतं. मुलं हुरळली होती. त्यांना आगगाडीत बसायला मिळणार म्हणून. कारण तो पर्यंत आगगाडी कुणी बघितलीसुद्धा नव्हती.

गोरेगावला कसं यायचं, ते रामजींनी सविस्तर कळवलं होतं. तसंच येण्याआधी पत्र टाका. म्हंजे स्टेशनावर तुम्हाला घ्यायला नोकर पाठवीन, असंही लिहिलं होतं.

मुलांनी त्याप्रमाणं पत्र पाठवलं. रामजींनी पाठवलेल्या पैशातून त्यांनी इंग्रजी बनावटीचे शर्ट, नवे बूट, जरीच्या टोप्या, रेशीम काठी धोतरं खरेदी केली. आणि आनंदा, भिवा, त्यांच्या वारलेल्या बहिणींची दोन मुलं त्यांच्याच जवळ राहत होती - त्यातला एक, असे तिघेजण निघाले. घरापासून स्टेशन दहा मैलांवर. म्हणून

टांगा केला.

निघताना मीराबाईनं शंभर वेळा बजावलं.

"भिवा - गाडीत - रस्त्यानं हूडपणा करू नको, दांडगाई करू नकोस. एकेकट्यानं कुठं जाऊ नका. गाडीत सांभाळून चढा. गडबडीनं उतरू नका."

"तू इथं एकटी. नीट सांभाळून राहा. स्वतःची काळजी घे. आमची मुळीच काळजी करू नको." भिवानंही तिला सांगितलं. नाही म्हटलं तरी पहिल्यांदाच तिला सोडून तो चालला होता. म्हणून एकीकडे तसं वाईट वाटत होतं आणि दुसरीकडे आगगाडीचं सुख होतं. कुतूहल होतं.

रामजींनी कळवल्याप्रमाणं ते मसूरला उतरले आणि बाबांनी पाठवलेला नोकर कुठंय? पाहू लागले. गाडी निघून गेली. उतरलेली सगळी माणसं गेली. पाच वाजता स्टेशनात उतरले. सहा-साडेसहा झाले. तरी नोकर आला नाही. ही झकपक पोशाखातली तीन मुलं! सामानासह प्लॅटफॉर्मवर केव्हाची एकटीच उभी! स्टेशनमास्तरांच्या लक्षात आलं. ते त्यांच्याजवळ आले.

"तिकीटं दाखवा." म्हणाले. तिकिट दाखवल्यावर "इथं का थांबलात?" विचारलं. मुलांनी सगळं सांगितलं.

"नोकर नाही आला तं नाही आला. मी तुम्हाला गोरेगावला जायला बैलगाडी करून देतो. चला." म्हणत स्टेशन मास्तरांनी त्यांना जात विचारली. भिवा चटकन् म्हणाला,

"आम्ही महार."

त्यासरशी स्टेशनमास्तर धक्का बसल्यासारखे दचकून एका क्षणात त्यांच्यापासून दूर सरकले! लांब गेले! भारी पोशाखातली. शुद्ध भाषा बोलणारी ही मुलं. त्यांना वाटलं होतं, ब्राह्मणाची. काही वेळानं त्यांनी विचार केला. सरकारी अधिकाऱ्याची मुलं. स्टेशनात एकटी. त्यांना काही झालं तर आपल्यावर येणार. म्हणून ते मुलांना गाडीवाल्यांकडं घेऊन गेले. बड्या घरची पोरं दिसतात, भाडं भरपूर मिळेल म्हणून प्रत्येक गाडीवान विचारल्यावर हुरळायचा. महार कळल्यावर तिरस्कारानं नाही म्हणायचा.

एक, दोन, तीन, चार! जेवढ्यांना विचारलं; तेवढ्यांनी गाडी बाटेल म्हणून नकारच दिला. संध्याकाळचे सात वाजत

आले. अंधार पडायला सुरुवात झाली. मुलांचा आगगाडीत बसण्याचा आनंद, नवलाई पार ओसरली. ती हीनदीन केविलवाणी झाली. मेटाकुटीनं एक गाडीवान तयार झाला. अंधारात महाराची मुलं नेली तर सूर्यनारायण साक्षीला नाही. आपल्याला पाप लागणार नाही, असं त्याला वाटलं असावं. अर्थात अटी होत्याच. भाडं दुप्पट! गाडी तो चालवणार नाही. म्हंजे तो म्हारांबरोबर गाडीत बसणार नाही.

सगळ्या मुलांना कासरा धरता येत होता. म्हणून त्यांनी हे कबूल केलं. मुलं बैलगाडीत. गाडीवान गाडी बरोबर रस्त्यानं पायी पायी चालतोय. असे ते एकदाचे गोरेगावच्या दिशेनं निघाले.

थोड्या वेळानंतर एक नाला दिसला. गाडीवान म्हणाला, ''तुम्ही इथं भाकरी खाऊन घ्या. पुढं पाणी मिळणार नाही. ठरलेल्या भाड्यातले मला थोडे पैसे द्या. माझं गाव जवळच आहे. मी पण भाकरी खाऊन येतो.''

गाडीवान पैसे घेऊन गेला. भुकेल्या मुलांनी बरोबर आणलेली भाजी भाकरी खाल्ली. पाणी प्यायला गेले. अन् तान्हेलेच परतले. पाणी इतकं घाणेरडं. खरं तर ते पाणी नव्हतंच. शेण - चिखल. अन् इतर घाणीचा तो गाळच होता. गाडीवान ताजातवाना होऊन आला होता. परत प्रवास सुरू झाला. पहिल्यासारखंच मुलं बैल हांकताते. गाडीवान पायी चाललाहे. अंधार वाढत होता. काही वेळानं गाडीवानानं गाडीत उडी मारली. कासरा आपल्या हाती घेतला. मुलं चकित झाली. पण काही बोलली नाही. त्याचे पाय दुखायला लागले. म्हणून त्यानं पापाचा विचार सोडून दिला असावा. रस्त्यावर दिवा नाही. उजेड नाही. माणसं तर सोडाच. पण एखादं कुत्रंसुद्धा दिसत नव्हतं. तीन तासात गोरेगावला पोहचू. दहा तर केव्हाच वाजून गेले होते. मुलांच्या अंगावर दागिने होते. गाडीवान भलतीकडेच तर नेत नाही? आपल्याला काही करणार तर नाही? बाबा भेटतील का? बय पुन्हा दिसेल का? असं वेडंवाकडं मनात यायला लागलं. अन् मुलांना रडूच कोसळलं. किती तरी वेळानं एक दिवा दिसला. तो टोलनाका आहे, गाडीवानानं सांगितलं. रात्री बाराला ते टोलनाक्याला पोचले. उजेड दिसला. माणसं दिसली. दुसऱ्याही बैलगाड्या दिसल्या. गाडी थांबताच

मुलांनी खाली उड्याच मारल्या. भूक इतकी भयंकर लागली होती. पण पाण्याचं काय? टोलनाक्यावरच्या माणसाला विचारावं, ठरवलं. ''मुसलमान आहोत सांगा. महार सांगितलं तर देणार नाही.'' गाडीवानानं बजावलं. आपण महारांना गाडीतून आणलं हे इतरांना कळलं, तर आपल्याला सजा होईल, अशी त्याला भीती वाटत होती की मुलांना प्यायला पाणी मिळावं, अशी त्याची खरोखरीच इच्छा होती? कुणास ठाऊक?

गाडीवानानं पढवलं. त्याप्रमाणं टोलनाक्यावरच्या माणसाला ''आम्ही मुसलमान आहोत.'' असं सांगूनही काही फायदा झाला नाही. उलट ''अरेरे पोरांनो... पाणी पाह्यजे काय? पाणी त्या डोंगरावर आहे. जा तिकडे?'' काळ्याकुट्ट काळोखात बोट दाखवून त्यानं छद्मीपणे म्हटलं. भूक लागली होती. जवळ खायचे पदार्थही होते. तरीही उपाशीच राहण्याची पाळी आली. केवढं दुर्दैव! भुकेल्या पोटी झोपून टोलनाक्यावर रात्र काढली. अंगात अजिबात त्राण नव्हते. भुकेने, तहानेने व्याकुळले होते. सकाळी ते बैलगाडीत कसे तरी चढले. गोरेगावी पोचले.

तेव्हा दुपार झाली होती. मुलांना पाहून रामजींना पहिला धक्का बसला आश्चर्याचा! कारण मुलांचं पत्रच मिळालं नव्हतं. तिघांनाही तशा अर्धमेल्या अवस्थेत पाहून दुसरा धक्का बसला. दुःखाचा. कुणाच्याही अंगात खाली उतरण्याइतकी सुद्धा ताकद नव्हती. रामजींनी एकेकाला उचलून नेलं. दीड दिवस पाण्याचा थेंब पोटात गेला नव्हता. तहानेनं जो तो तळमळत होता. रामजींचा जीव इतका कळवळला! त्यांनी मुलांना खाऊ-पिऊ घातलं आणि आराम करा म्हटलं.

संध्याकाळी मुलं थोडी ताजीतवानी झाली. त्यांनी रामजींना सर्व हकीकत सांगितली. रामजींनी सगळं ऐकून घेतलं अन् ते शांतपणानंच म्हणाले,

''झालं हे चांगलंच झालं.''

मुलं चमकली. त्यांनी एकमेकांकडं पाहिलं. आम्हाला निव्वळ महार म्हणून कुणी पाणीही दिलं नाही. ह्यांना केवढी चीड यायला हवी. पण हे जराही संतापले नाहीत?

''बारा-तेरा वर्षांच्या लहान मुलांना ती दिवसभर तान्हेली

आहेत, हे माहीत असूनही भररात्री पाण्यासाठी डोंगरावर जा अशी क्रूर टिंगल करणारा तुम्हाला भेटला. टोलनाक्यावरच्या इतक्या माणसांपैकी एकालाही तुम्हाला पाणी देण्याची इच्छा झाली नाही. गाडीवानानं पाणी म्हणून तुम्हाला गाळाकडं पाठवलं. म्हंजे ह्या देशात कशा प्रकारची माणुसकी - भूतदया आहे, हे तुम्हाला कळलं. केल्यानं देशाटन ज्ञान मिळतं, म्हंतात, ते असं सिद्ध झालं. घरात माझ्या, बयच्या छायेखाली, पलटणीच्या जातपात न मानणाऱ्या वातावरणात तुमचा जन्म जाणार नाही. तुम्हाला आयुष्य काढायचंय, जगायचंय, घराबाहेरच्या जगात. समाजात! तिथं हे असलेच अनुभव तुम्हाला पदोपदी येतील. तरीही तेव्हा भेदरून न जाता, निराश न होता, ताठ उभं राहून आत्ताच्या जनावर जीवनाच्या विरुद्ध झगडायचंय तुम्हाला. मनुष्याचं स्वाभिमानी, सन्मानीय जिणं जिंकून घ्यायचंय. त्या वाटचालीत हे असले अनुभव आपले उत्तम शिक्षक समजा. अंधारात बारीकशी वात केवढा प्रकाश पसरवते! प्रवासातला हा प्रसंग तुम्हाला प्रचंड प्रज्ञावंत, तसंच विद्वान पंडित बनवणारा पाठ आहे. ह्यावरून आपल्या बंधू-बहिणींच्या बिकट परिस्थितीची कल्पना येऊ द्या. लोकांच्या, समाजाच्या अशा वागण्याचं दु:ख वाटून घेऊ नका. तर त्यापासून बोध घ्या. धडा शिका.'' धीर गंभीर स्वरांत रामजी बोलत होते.

रामजी खरंच भिवाचे किती उत्तम सल्लागार, मार्गदर्शक होते. वडिलांनी त्यांना विद्येच्या वाटेवर नेलं. व्यवहारज्ञान दिलं. मग बाबासाहेबही बॅरिस्टर झाले. डॉक्टर झाले. दीन दलितांचे दीप झाले. अशातऱ्हेनं एकाचवेळी त्यांनी आपल्या पिता असलेल्या आचार्यांचं, आचार्य असलेल्या पित्याचं पितृऋण, गुरुऋण फेडलं. मुलांनो, तुम्हीही आपल्या आई-वडिलांच्या सदिच्छा पुऱ्या करून त्यांच्या ऋणांतून उतराई व्हा.

□ □ □

# पेंडसे मास्तरांचं प्रेम

"बय... बय... तुळशे... मंजे...." भिवा ओरडत होता.

"आभाळातून पाण्याचा पाऊस पडतोय! भिवा दाराबाहेरून हाकांचा पाऊस पाडतोय." दोघी बहिणी म्हणाल्या.

"अगं पुढं होऊन बघातरी... कशाला बोलवतोय. काय झालंय त्याला?" मीराबाई पांगळी. तिला चालता तर येतच नव्हतं. पण जागचं पटकन हलणंही जमत नसे. म्हणून बसल्या जागेवरूनच ती त्या दोघींना कळवळून म्हणाली.

"काही झालं नसेल त्याला. फार नाटक्या. सोंगाड्या आहे तो. तू काळजी करू नकोस."

त्या असं बोलताहेत, तो भिवा आत आला. दप्तर ठेवीत म्हणाला,

"अगं एक गंमत सांगायचीय तुम्हाला."

"पाह्यलंस आत्ते." म्हणत तुळशी हसली. तिला साथ देत मंजुळाही हसली. मीराबाईनं त्यांच्याकडं जाणून बुजून दुर्लक्ष केलं अन् भिवाला म्हणाली,

"हातपाय पूस आधी नीट. भर पावसातून आला आहेस."

"ते मी करतो ग. आधी तुम्ही सगळ्या बसा. पटकन् बसा माझ्या समोर." भिवा म्हणाला.

"ए तू इंग्रजी दुसरीत गेल्यापासून फार रुबाब दाखवतोस हं!" तिघीजणी खोट्या रागानं खरंतर गंमतीनं म्हणाल्या. अन् त्यानं म्हटल्याप्रमाणं बसल्या. मग भिवा त्यांच्यापुढं बसत म्हणाला, "अशी मज्ञा आली आज."

"कीर्तनकारासारखं पाल्हाळ लावू नको." मंजीनं टोकलं.

"होय... झटदिशी सांग..." तुळसानं री ओढली.

त्यांच्यापुढं ऐटीत बसलेला भिवा थाटात बोलला, ''कथा-कीर्तनच सांगणारे... नीट ऐका.''

मीराबाई त्याच्याकडं कौतुकानं बघत होती.

भिवानं सुरुवात केली, ''माझा स्वभाव तुम्हाला माहीतच आहे. एकदम जिद्दी. एकदा करायचं म्हटलं की करायचंच. त्यातून एखाद्यानं कर म्हटलं की मुळीच करायचं नाही. नको म्हटलं - ''

''की मुद्दाम करायचं. पुढचं सांग.'' तुळसा मध्येच म्हणाली.

''आता गोष्ट संपेपर्यंत मध्येमध्ये बोलायचं नाही हं!'' भिवानं दम दिला. अन् पुढं सांगायला सुरुवात केली,

''तर आज सकाळी खूप पाऊस आला. रस्त्यात काही मुलं मला म्हणाली. भिवा पाऊस किती पडतोय बघ. छत्री खालीच राहा हं. नाहीतर पावसात चिंब भिजशील.

''मग काय मी बिन छत्रीचं पावसातच जायचं ठरवलं. आनंदाला म्हटलं, तू जा छत्री घेऊन. त्यानं मला खूप समजावलं. पण मी साफ सांगितलं. नाही म्हंजे नाहीच. पावसातूनच जाईन. माझं पाटी दप्तर त्याला दिलं. म्हटलं एवढं ने. म्हंजे भिजणार नाही. माझी ही आवडती वेलबुट्टीची टोपी. तीही त्याच्याजवळ दिली ओली होऊ नये म्हणून: मी जाम ऐकत नाही हे पाहून तो छत्री घेऊन निघाला. त्याला पुढं जाऊ दिलं. अन् मग मी निघालो मस्तपैकी पावसात भिजत भिजत! पाऊस काही केल्या थांबला नाही. तसाच पावसात शाळेत पोचलो. तर भिजून असा निथळत होतो की, माझ्याच अंगातून पाऊस पडतोय वाटावं. वर्गाबाहेर उभा! तर आमच्या पेंडसे मास्तरांनी पाह्यलं. त्यांचं माझ्यावर खूप प्रेम आहे!''

''हयँ!'' करून दोघी बहिणींनी चिडवलं.

''आता हयँ करताय. सगळं ऐका. मग म्हणाल हो रे बाबा! खरंच सांगतोस.''

''तूं सांग पुढं. त्यांच्याकडे नको लक्ष देऊ, राजा.'' मीराबाई म्हणाली.

''मी इतका भयंकर भिजलोय पाहून पेंडसे सरांना खूप वाईट वाटलं. त्यांनी मायेनं विचारलं, असा भिजत का आलास? तुझ्याकडे छत्री नाही का? म्हटलं, आहे सर, पण एकच. ती

माझ्या वाट्याला कशी येणार? अन् शाळेत तर यायलाच हवं. मी थाप मारली. पण हे त्यांच्या बिचाऱ्यांच्या लक्षातच आलं नाही. खूप सरळ, साधे आमचे पेंडसे मास्तर. त्यांनी आनंदाला बोलावलं. त्याचे कोरडे कपडे पाहून म्हणाले, 'तुझ्या अंगात किती सदरे आहेत रे?' तो म्हणाला, 'एकच.' माझे कपडे भिजल्यानं अंगाला घट्ट चिकटले होते. मास्तरांच्या मनात काय आलं कुणास ठाऊक त्यांनी आपल्या मुलाला बोलावलं. त्याला म्हणाले, 'ह्याला घरी ने. आंघोळ करायला गरम पाणी दे. नेसायला एक लंगोटी दे. त्याचे कपडे वाळत घालायला लाव. म्हंजे संध्याकाळी कोरडे कपडे घालून तो घरी जाईल.''

''खरं रे बाबा खरंच! मास्तरांचं तुझ्यावर खूप प्रेम हं'' बहिणींना बोलल्यावाचून राहावलं नाही.

''मध्ये मध्ये बोलू नका गं कारटयांनो. फार कनवाळू रे भिवा तुझा मास्तर. सांग पुढं काय झालं?''

''मास्तरांनी सांगितल्याप्रमाणं त्यांच्या मुलानं केलं. मी खूश. म्हटलं चला, संध्याकाळ पर्यंत शाळेच्या कोंडवाड्यातून सुटका. बुट्टी मारायला मिळाली. मग काय शिट्टी वाजवीत मजेत टिवल्या बावल्या करीत मी शाळेच्या आसपास फिरतोय. तर मी वर्गात आलो नाही म्हणून मास्तरांनी एका मुलाला पाठवलं मला बोलवायला. जाणं तर भागंच होतं, गेलो. मास्तर म्हणाले 'वर्गात बस.' मनात आलं. असं लंगोटीतच? मला इतकी भयंकर लाज वाटली. सगळ्या मुलांच्या समोर नुसतं लंगोटीतच बसायचं? मास्तरांच्या लक्षात आलं. मला खूप शरम वाटतेय. त्यांनी मग समजावलं. म्हणाले, 'तुझा अभ्यास बुडेल. वर्गात बस. आणि लाजतोस कशाला? इथं तर सगळी मुलंच आहेत. तुझ्यासारखी.' ऐकलं, त्यांचं. बसलो तसाच. पण सारखं रडायला येत होतं. शाळा सुटल्यावर त्यांच्या घरी गेलो. तोवर धोतर, सदरा छान वाळले होते. हे पाहा ना.'' भिवानं अंगावरचे कपडे दाखवले.

''खरंच देवमाणूस म्हणायचा हा मास्तर. किती त्यांचे उपकार. अशा ओल्यागच्च कपड्यांत त्यांनी तसंच घरी पाठवलं असतं. तर तुला हुडहुडी भरून आली असती, बाबा.'' तुळसा, मंजी मीराबाई आळीपाळीनं म्हणत राहिल्या.

''दिवसभर मी भिजल्या कपड्यांत राहू नये म्हणून त्यांनी स्वत:च्या घरी पाठवलं. मला केवढा मोठेपणा त्यांचा. माझे हे पेंडसेसर बाम्हण आहेत बरं का! तरीसुद्धा!''

''अरे ब्राह्मण असले म्हणून काय झालं? शेवटी माणूसच! त्यांनाही माणुसकी असती. रंजल्यागांजल्यांची माया येती.'' मीराबाई मनापासून म्हणाली.

''खरं गं आत्ये, माझे मराठी शाळेतले आंबेडकर मास्तर! हे पेंडसे सर! दोघांचंही माझ्यावर किती प्रेम! ह्यांच्यामुळं शाळा नकोशी वाटत नाही. बाकीचे सगळे शिवू नको, शिवू नको, दिवसातून शंभरदा म्हंतात. तरी शिक्षण सोडावं वाटत नाही. ब्राह्मण पण किती मायाळू! किती चांगले! म्हंजे सगळे ब्राह्मण काही वाईट नसतात.'' बहिणींनी मान डोलवली.

मीराआत्या म्हणाली, ''बरोबर बोललास भिवा, अरे चांगलं वाईट सगळ्यांवर असतं. आपण चांगलं तेवढं ध्यानात ठेवावं. वाईटाला विसरून जावं.''

मुलांनो, तुम्ही आंबेडकरांचं संपूर्ण चरित्र वाचाल तेव्हा तुम्हाला कळेल की मोठेपणी त्यांचे कितीतरी ब्राह्मण मित्र होते. एवढंच नाही तर अस्पृश्यांना सन्मानाचं, माणुसकीचं जीवन लाभावं, म्हणून केलेल्या चळवळीत, लढ्यात अनेक ब्राह्मणांनी त्यांना मनापासून मोलाची मदत केली. ह्यातील अनेक तळमळीचे कार्यकर्ते ब्राह्मणच होते. जातीवरच सर्व काही नसतं हे खरं, हो ना?

□ □ □

# डबक चाळीतला राजहंस

सातार्‍याच्या हायस्कूलमधून भिवा इंग्रजी चौथी म्हंजे आत्ताची आठवी पास होण्याआधीच रामजींची नोकरी संपली. पेन्शन येत होतं, पन्नास रुपये. सातार्‍यात दुसरं काम मिळण्याची शक्यताच नव्हती. पुढं काय करावं? अशा विचारात रामजी बसले होते. मीराबाईनं बराच वेळ वाट पाह्यली. पण ते काही बोलेनात. म्हणून तिनंच विचारलं,

''कसली एवढी काळजी लागलीय, दादा? किती वेळचा बोलत नाहीस. गप्प गप्प आहेस.''

''विचार करतोय गं. पुढं कसं होईल?''

''मीठभाकरी खाऊन राहू कसंतरी...''

''घर कसं चालवायचं ही फिकीर नाही ग. चिंता वाटतेय भिवाच्या शिक्षणाची. त्याला उत्तम शिक्षण कसं मिळेल? कुठं मिळेल? आपली पैशाची ओढग्रस्त अशीच चालू राह्यली तर त्याच्या शिक्षणाचं काय? वह्या-पुस्तकं-फी ला पैसे आणायचे कुठून? वाटतं-''

''बोल ना.. थांबलास का? काय वाटतं तुला सांग ना दादा.''

''वाटतं मुंबईला जावं. म्हंजे बिर्‍हाडच हलवावं. पण..''

''पण बिण काही नाही. तू म्हंतोस तसंच करू. तुझ्या मनात आलं. ते विचारांतीच ना! आणि तुझा विचार कधी चुकीचा नसतो. सगळ्या बाजू बघून पडताळूनच तू काय करायचं ते ठरवतोस.''

बहिणीचं बोलणं ऐकून रामजींना आनंद झाला. ते म्हणाले, ''मला आता दुप्पट हिंमत आली मीराबाई. किती पटकन तुला

हे पटलं. मला उगीचच भीती वाटत होती. तू नाही म्हणशील. विरोध करशील.''

रामजींनी मुंबईला जायचं ठरवलं होतं. त्याची दोन कारणं होती. मुंबई मिलिटरीचं मोठं केंद्र होतं. सुभेदारांच्या वेळचे पुष्कळ इंग्रज मिलिटरी अधिकारी मुंबईत होते. ते आपल्याला कुठंतरी नोकरीला लावतील, अशी त्यांना खात्री वाटत होती. दुसरं म्हंजे इंग्रजांनी खेडोपाडी शाळा काढल्या. तरी मुंबईच माहेरघर होतं, विद्येचं, शिक्षणाचं, विविध ज्ञानप्राप्तीचं, बौद्धिक साधनेचं. त्याकाळी नोव्हेंबरमध्ये वार्षिक परीक्षा होत! नोव्हेंबरमध्ये निकाल लागत. म्हणून भिवा इंग्रजी चौथी आणि आनंदा इंग्रजी पाचवी पास होताच, रामजींनी नोव्हेंबरमध्ये साताऱ्याहून बिऱ्हाड हलवलं आणि मुंबईला परळच्या डबक चाळीत थाटलं. ए हंसताय काय? बदक नाही. डबकच! मी डबक चाळ काही चुकून नाही म्हटले. हवं तर दामोदर हॉलच्या तिथे जा अन् खात्री करून घ्या. डबक चाळ कुठं होती पाहून या.

नावाप्रमाणंच चाळीतलं वातावरण डबक्यासारखंच होतं. सातारच्या घराची तुलना होऊ शकणार नाही. अशी होती ही जागा! पण करणार काय? जवळ जास्त पैसा नाही. शिवाय त्याकाळी परळला बरेच महार मिलिटरी पेन्शनर राहात होते. आजूबाजूला आपलेच लोक असले की भिवाला ह्यापुढं तरी अस्पृश्यतेचे चटके कमी बसतील, त्याच्या अभ्यासाला फारसा उपद्रव होणार नाही. इथं राहण्यात सुभेदारांनी असाही विचार केला असावा.

पहिल्यांदा त्यांनी दोघाही मुलांना मराठा हायस्कूलमध्ये घातलं. पण तिथला अभ्यासक्रम त्यांना फार योग्य, उत्तम वाटला नाही म्हणून मग त्यांनी भिवा, आनंदाला एल्फिन्स्टन स्कूल ह्या सरकारी शाळेत दाखल केलं. मुंबईत आल्यावर भिवाच्या आयुष्यात खूप बदल झाले. त्यातला एक म्हंजे शाळेत जाताना चड्डी घालणं.

सुभेदारांनी नोकरी मिळवण्याचा निकराचा प्रयत्न केला. मिलिटरीतल्या आपल्या एकूण एक साहेबांकडे ते हेलपाटे घालून दमले. ओळखीच्या-बिन ओळखीच्या सर्वांना भेटून-विनवून झालं. पण यश आलं नाही. नोकरी मिळाली नाही. दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा खर्च. घरातल्या सात-आठ माणसांचा उदरनिर्वाह. पेन्शनच्या

पन्नास रुपयांत भागवणं फारच कठिण झालं. तेव्हा अगदी नाइलाजानं त्यांनी वेगळा विचार केला. एके दिवशी आनंदाला म्हटलं,

"घरातली सगळी परिस्थिती तुला माहीतच आहे. खरंतर आणखी एक वर्षानंतर तू मॅट्रिक होशील. पण तुला आत्ताच नोकरीला लावावं. असं मला वाटतं."

"माझ्या शिक्षणाचं काही नाही, बाबा. पण आपला भिवा खूप तल्लख आहे. बुद्धिमान आहे. फारसा अभ्यास न करताही चांगला पास होतो. त्याचं शिक्षण चालू राह्यलं पाहिजे." आनंदा ताबडतोब म्हणाला.

"ह्यासाठीच तर तुला शाळा सोडायला लावतोय."

"त्याच्या शिकण्यासाठी मी काहीही करीन, बाबा. शिकून तो नक्की काहीतरी वेगळं करील. तुम्ही मुळीच काळजी करू नका. माझ्यासाठी खुशाल नोकरी शोधा."

"शोधायची गरज नाही. टाईमकीपरची जागा खाली आहे. भायखळ्याच्या रिचर्डसन क्रूडास मध्ये."

रामजींनी खुशखबर दिली. जराही न कुरकुरता आनंदा नोकरीला लागला. रामजींना खूप बरं वाटलं.

आंबेडकरांच्या शिक्षणाचा गोवर्धन वडिलांच्या करंगळीवर असला तरी घरातल्या सर्वांचाच त्याला हातभार लागत होता, तो असा.

आनंदरावाच्या पगारामुळं घरातली हलाखी थोडी कमी झाली. तरी जागा मात्र अपुरीच होती.

एवढीशी खोली! त्यातच कोपऱ्यात मोरी. सैंपाक पण तिथंच करायचा. आंघोळी, उठणं, बसणं, जेवणं, झोपणं, सगळं सगळं त्याच खोलीत आणि तेही सगळ्या माणसांचं. घरात माणसं तरी किती? मीराआत्या, वडील रामजी, सावत्र आई जिजाबाई, आनंदा, त्याची बायको, लक्ष्मी आणि भिवा स्वत:. बायका माणसांना आंघोळीला कपडे बदलायला आडोसा हवा. तेव्हा लुगड्या-चादरीचा पडदा लावायचा. आणखी काही काही त्या खोलीत होतं. म्हंजे दळायचं जातं. शिवाय शेळी! फक्त रात्रीची घरात बांधलेली असली म्हणून काय झालं? तिच्या लेंड्यांचा-अंगाचा रात्रंदिवस घरभर वास गच्च कोंडलेला! चुलीतली लाकडं धड पेटली तर देवच पावला म्हणायचा, कारण ती स्वस्तातली. त्यामुळं बहुधा ओलसरच

असायची. चुलीतला धूर पहाटेपासून डोळ्याला झोंबून दिवसभर पाणी आणायचा. संध्याकाळी त्याला दुप्पट करायचा चिमणीचा धूर! ए, ए, चिमणी म्हंजे ती नव्हे! चिव चिव करणारी. चिमणी म्हंजे बत्ती. अरे, त्याकाळी वीज नव्हती. वीजेचे दिवे नव्हते. आजच्यासारखे! बल्ब - ट्यूब नसे. अंधार पडल्यावर उजेड हवा, तर बाटली घ्यायची त्यात घासलेट भरायचं, झाकणाच्या छिद्रातून चिंधी सोडायची. वर टोक ठेवायचं. ते पेटवायचं. ह्याला म्हणायचे चिमणी! अर्थात उजेड देणारे पण बिन धुराचे, दुसरेही खूप छान छान दिवे होते. घासलेटचेच! पण ते भिवा सारख्यांना परवडायला हवेत ना!

अशा खोलीत बसून भिवा अभ्यास कसा करीत असेल? करा कल्पना. अन् काय वाटतं सांगा बरं! हे झालं घरातलं. बाहेर चाळीतलं वातावरण तर आणखीनच भयंकर!

वर-खाली! सगळ्या मजल्यांवरच्या खोल्याखोल्यांतून माणसं अशीच भरलेली. आगपेटीत काड्या असतात ना तशी! भिवाच्या घरात एक नवलाई होती. कुणी दारू पीत नव्हतं की अचकट विचकट शिव्या देत नव्हतं. तुम्ही जे करत नाही, ते बाकीच्यांनी केलं तर तुम्ही थोडंच त्यांना थांबवू शकता? मुळीच नाही. चाळीतल्या जीवनात कुणाला चार चांगल्या गोष्टी सांगणं चुकीचंच ठरतं. भांडणं - मारामाऱ्या ह्याचाही डबक चाळीत सुकाळ होता. हे सगळं सहन करणं हाच एक मार्ग! किंवा ह्यांतून मार्ग काढणं हा उपाय! रामजी सुभेदार मिलिटरीतले! लढणं त्यांचं कर्तव्य होतं. पळून जाणं, निराश होणं, सैनिकाचा धर्म नव्हे. म्हणूनच तर ते स्वस्थ बसले नाही. भिवाचं शिक्षण हा त्यांचा ध्रुवतारा होता. त्यासाठी त्यांनी तपश्चर्या सुरू केली. म्हंजे काय करायचे सांगू? भिवा संध्याकाळी शाळेतून खेळून घरी आला की ते बयला, सुनेला सांगत. त्याला जेवायला लवकर वाढा. भिवाचं जेवण आटोपलं की लागलीच ते त्याला झोपायला लावीत. कधी कधी पंचाईत व्हायची. भिवा पुस्तक वाचीत बसायचा. मुंबईतून आल्यापासून तो जसा वाचनवेडाच झाला होता. लहानपणचे मित्र तुटले म्हणून म्हणा किंवा परिस्थितीनं वा आजवर झालेल्या अमानवी अनुभवांमुळं असेल. माणसांपेक्षा ग्रंथच त्याला जास्त जवळचे वाटू

लागले होते. जेवल्यानंतर भिवा पुस्तक वाचू लागला की रामजी त्याच्या हातातले पुस्तक हिसकून घ्यायचे नि त्याला जबरदस्तीनं झोपायला लावायचे.

जात्यावर रोजचं दळण. त्यामुळं तिथं आजूबाजूला पीठ पडलेलं, तिथंच बांधलेली शेळी! शेळीला का शिस्त असते? ती बांधल्या जागीच सगळं करायची. भिवा त्यातच अंगाची मुटकी करून पडे. गाढ झोपे.

रामजी दाराबाहेर बसत व्हरांड्यात. अगदी एखाद्या पहारेकऱ्यासारखे! चाळीतला धिंगाणा, धुमाकूळ, कलकलाट, गोंगाट मध्यरात्रीनंतर कमी व्हायचा. दीड-दोन वाजता सगळीकडे सामसूम झालं की मग ते आत जात. गाढ झोपलेल्या भिवाला उठवित. तोंड धुवायला लावीत. चिमणी पेटवीत. अन् त्याला अभ्यासाला बसवित. अपुऱ्या झोपेनं डोळे चुरचुरत. त्यात चिमणीचा धूर! अजून झोपावं, थोड्यावेळानं उठावं, भिवाला फार फार वाटे. पण झोपणार कसं? बसल्या बसल्याही डोळे जरा मिटायचे म्हटलं. तरी समोर रामजी असत! डोळ्यांत तेल घालून बघत बसलेले. तो मनापासून अभ्यास करतोय, अशी खात्री झाली की मगच आतापर्यंत जागणारे रामजी झोपत. बाप-लेक दोघंही आपापल्या परीनं तस्यां जागर्ति संयमी सारखे होते. भिवानं शिक्षणासाठी असे अपार कष्ट घेतले. ह्या सगळ्या प्रकाराला तुम्हीही घोर तप म्हणाल की नाही? पूर्वीच्या ऋषीमुनींसारखं रानावनात गेले नाही, तरी हेही एक प्रकारचं तपच होतं. हो की नाही? भिवाच्या अभ्यासाचा हा आदर्श तुम्हीही पुढं ठेवून त्याप्रमाणं वागणार ना?

□ □ □

# पुस्तकांचा छंद

भिवानं दप्तर उचललं खरं, पण पाऊल नाही. तो तिथल्या तिथं घुटमळत राहिला. बयचं बारीक लक्ष होतं. ना तो जाईना. ना काही बोलेना. रामजींच्याही ध्यानात आलं. त्यांनाही कारण कळेना.

"नीघ आता. गाडीत नीट चल. नीट उतर. घाई गडबड करू नकोस." बय रोजच्याप्रमाणं तेच तेच म्हणाली.

तरी भिवा हालला नाही. जागीच उभा राह्यला.

"काय झालं रे?" रामजींनी विचारलं.

"नाही. म्हंजे काय बाबा? थोडे पैसे हवे होते."

"दे.. रे दादा. दे त्याला. अधी मधी भूक लागत असेल. काही तरी घेईल खायला."

"खाण्यासाठी नाही. बय - पुस्तक घ्यायचंय एक."

"अरे, मागच्या महिन्यातच पुस्तक आणलंस. एवढ्यात परत?" रामजी आश्चर्यानं म्हणाले.

"मला ह्यें तुझं आक्रित नाही कळत भिवा- अरे ह्या वयात पोरं हट्ट करतात, खायच्या वस्तूसाठी. लाडू-पेढं मागतात. शेव-चिवडा मागतात. मिळाल्यावर आवडीनं खातात. पण बघावी तेव्हा तुला बुकाचीच भूक! वाचनाच्या भूतानं असं जब्बर झपाटलंय, ते सोडायाच तयार नाही तुला."

"अगं बय, खाल्लेलं एक दिवससुद्धा पोटात राहात नाही. वाचलेलं कायम राहातं डोक्यात. पुस्तकातलं आयुष्यभर पुरतं. बुकं बुद्धी वाढवतात. खायचं सुख क्षणभंगुर. ज्ञान - विचार-माहिती जन्मभर साथ सोबत करते." हजरजबाबी भिवानं आपल्या अक्कल हुशारीनं बयचं म्हणणं झटक्यात खोडून काढलं. रामजी गालातल्या गालांत हसले. भिवाचं उत्तर ऐकून त्यांच्या मनात अभिमान,

आनंद, कौतुक दाटून आलं. पण.. एकीकडे भिवाच्या मागणीचं त्यांना कौतुक वाटत होतं. तर दुसरीकडे चिंता. ती अशासाठी की ह्याला पुस्तकाला पैसे हवेत. ते कुठून आणू? आजकाल वारंवार चार-आठ दिवस गेले की भिवा पुस्तकाला पैसे मागायचा. घरातला खर्च. भिवाच्या शिक्षणाचा खर्च भागवताना नाकी नऊ येत. म्हणूनच भिवानं पुस्तकाला पैसे मागितले की त्यांना धडकीच भरे! तशात हे पुस्तक अभ्यासाचं नसायचं. कधी चरित्र. कधी एखाद्या विषयावरचे वाद-विवाद. वैचारिक मंथन. अशी पुस्तकं असायची. प्रौढांनी, विद्वानांनी, उच्चशिक्षितांनी वाचायची पुस्तकं आपला १४/१५ वर्षांचा शाळकरी मुलगा वाचतो, म्हणून रामजींना अभिमान - आनंद वाटायचा. त्यासाठीच ते त्याला कधीच पुस्तकाला पैसे द्यायला नाही म्हणत नसत. शिवाय हा त्याचा छंद चांगलाच होता. सकाळी पैसे मागितले म्हंजे संध्याकाळी नक्की मिळणार. हे भिवाला अनुभवानं माहीत झालं होतं. सवयीचं झालं होतं. म्हणूनच पैसे मागितल्यावर तो शाळेत निघाला.

"पास केव्हा संपणारे रे तुझा? एवढ्यात नकोत ना पासाला पैसे?" रामजींनी विचारलं.

"नको.. नको.." म्हणत भिवा सटकला. बाबांनी विचारल्या प्रश्नाचं उत्तर काय द्यायचं, एकदा नीट ठरवून ठेवलं पाहिजे. भिवा मनाशी म्हणाला.

भिवाची शाळा एल्फिन्स्टन हायस्कूल होतं - धोबी तलावाला. तो राहत होता परळला. शाळेत जायला तो उतरायचा मरीनलाइन्सला. परळहून लोकलनं जायचा. परळ ते मरीनलाइन्सच्या रेल्वे पासाला रामजी पैसे देत. पण भिवा कधीच पास काढीत नसे वा तिकीटही घेत नसे. प्रवासखर्च म्हणून मिळालेले पैसे भिवा... छे छे.. तुमच्या मनात आलं तसलं काही तो करीत नसे.. म्हंजे भलतं सलतं. भिवा खूप वेगळा मुलगा होता. तो हे पैसे खर्च करायचा आपल्या आवडीचं पुस्तक घ्यायला. का कुणास ठाऊक! पण ह्याचं त्याचं पुस्तक त्याला मागायला आवडत नसे. पुस्तक स्वतःचं असावं, आपल्या मालकीचं हवं, असा त्याचा कटाक्ष होता. वाचून झाल्यावर आपलं. आपलं हं... आपलं पुस्तक तो मित्रांना वाचायला देई. भिवाचा पुस्तकाचा खर्च त्या पुस्तकाची किंमत एवढाच नसे.

प्रत्येक पुस्तकाबरोबर वह्या, कागदही तो विकत घेई. कशाला आहे माहीत? त्या पुस्तकातले नवे शब्द, म्हणी, वाक्संप्रदाय लिहून काढण्यासाठी. पुस्तकातला विषय, त्यांतल्या विचारांचीही तो नोंद करी.

पास, तिकीट जवळ नसताना लोकलनं जायचं. साहजिकच कधीकधी टी.सी. पकडायचा. पण शाळेतला मुलगा म्हणून सोडून द्यायचा. तर कधी टी.सी. पकडील ह्या भीतीनं भिवा परळ ते धोबी तलाव चक्क चालत जायचा. बरं हे चालणं तरी कसं? दप्तर अडकवलेलं. दोन्ही हातांत उघडलेलं पुस्तक. अन् शहाणे वाचत-वाचत चाललेत. खूपदा त्या दिवसाच्या अभ्यासाचे धडे, तर काही वेळा अवांतर पुस्तक वाचणं. त्या काळात ट्रामही होती. तिचं खूप स्वस्त भाडं. आणा दोन आणे! पण ह्या पुस्तकप्रेमींना ट्रामनं जाणं हे पैसे उडवणं वाटे. पुस्तकांसाठी मात्र सुपुत्र एकावेळी २/३ रुपये सहज खर्च करीत. ऐंशीनव्वद वर्षांपूर्वीचे दोन-तीन रुपये म्हंजे महाराज कसा भारी ग्रंथराज खरेदी करीत असतील. कल्पनाच करा. त्या काळात तेवढ्या पैशात सात-आठ माणसांच्या कुटुंबाचा आठवडाभर प्रपंच चालायचा की!

तरीसुद्धा भिवानं पुस्तकाला पैसे मागितले आणि रामजींनी दिले नाही असं कधीच व्हायचं नाही. त्यानं सकाळी मागावे ह्यांनी संध्याकाळी द्यावे. ताबडतोब मात्र कधीच नाही. का बरं? घरात नसायचेच म्हणून ताबडतोब नाही.

भिवा शाळेत गेला की थोडावेळानं काखोटीला मुंडासे मारून ते बाहेर पडायचे आणि थेट जायचे आपल्या लेकीकडे! भिवाच्या लग्न झालेल्या दोन्ही मोठ्या बहिणी मुंबईतच होत्या. पहिल्यांदा पोचायचे धाकटीच्या घरी. ती बिचारी आनंदून बाबाचं स्वागत करायची. बोलणं, चालणं व्हायचं. रामजीचं काही ह्या गोष्टीत लक्ष नसायचं. ते काय मुलीची खुशाली विचारायला यायचे? आले होते? नाहीच मुळी. मग शेवटी ते विषय काढायचे, पैसे मागायचे. ती मग कळवळून एवढंसं तोंड करून म्हणायची.

"एवढे पैसे नाहीत हो बाबा माझ्यापाशी."

हे ऐकलं की रामजी तडक उठायचे. थोरल्या मुलीकडे जायचे. तिच्याजवळ पैसे मागायचे. सगळ्यांचीच सारखी परिस्थिती.

२/३ रुपये केवढी रक्कम! तिनं धाकटीसारखंच म्हटलं की.. अं.. हं रामजी तिथून आणखी कुणाकडं जाऊन परक्यांच्या-तिऱ्हाईतांच्या पुढं हात पसरीत नसत. मुली त्यांच्या हक्काच्या म्हणून ते थोरलीला म्हणत,

''मग तुझा एखादा दागिना दे बरं!''

वडिलांनीच करून दिलेला दागिना वडिलांच्या गरजेला उपयोगी पडतोय म्हणून मोठ्या खुशीनं तत्परतेनं ती देई. आता काम झालंच. अशा आनंदात रामजी एका ठराविक मारवाड्याकडं जात. त्याच्याकडे दागिना गहाण ठेवीत. एक महिन्यासाठी.

भिवाच्या पुस्तकाची बेगमी, खरेदी व्यवस्था अशा तऱ्हेनं सफल संपूर्ण संपन्न व्हायची. तसा कधी थोडाफार बदल व्हायचा. म्हंजे थोरली ऐवजी धाकलीचा दागिना मारवाड्याकडं ठेवला जायचा. (अर्थात ह्यातला एक शब्दही भिवाच्या कानावर जात नसे. किंवा आपल्या पुस्तकाच्या पैशासाठी बाबा बहिणींकडे जातात, त्या दागिने देतात, ह्याचा त्याला तेव्हा वासही लागत नसे.) रामजी रामाप्रमाणे सत्यवादी एकवचनी होते. महिना संपला की सोडवायचे. जिचा असेल तिला परत करायचे. भिवाच्या पुस्तक खरेदी खातर हे रामायण वारंवार घडायचं. पण ह्यातलं एक अक्षरही त्याच्या कानावर त्यावेळी गेलं नाही की असं काही होतंय, ह्याचा तेव्हा त्याला वासही लागला नाही. भिवाच्या ज्ञानयज्ञात, उपासनेत त्याच्या घरातले सगळे आपापल्यापरीनं समिधा टाकून हविर्भाग देत होते.

पुस्तकाच्या पैशासाठी बाबांना किती यातायात करावी लागते. भिवाला काहीच कल्पना नसायची. पुस्तक वाचता वाचता कधी खूप झोप यायची. मग काय? मग पुस्तकाची उशी करायची. त्यावर डोकं ठेवून निद्रादेवीच्या राज्यात शिरायचं. तुम्ही म्हणाल, ह्यात काय चुकलं? अहो, भिवाची शेंडी चांगली भरदार, त्यावर चपचपीत तेल लावलेलं. तुम्हीच सांगा, नव्या पुस्तकाची काय दशा होत असेल एका रात्रीत.

असा होता भिवाचा पुस्तकांचा छंद अन् त्याचे वडील तो पुरवीत अशा तऱ्हेनं!

□ □ □

# फळ्याला शिवू नको!

टण्-टण्-टण् तास संपल्याची घंटा झाली. सर वर्गाबाहेर गेले. दुसरे येईपर्यंत मध्ये पाच मिनिटं सहज जायची. ह्या वेळात तुम्ही मुलं काय करता? गडबड बडबड. तेच त्या मुलांनी सुरू केलं. ह्यात सामील नव्हता एक मुलगा. फक्त एकजण! अगदी शेवटच्या बाकावर तो बसला होता. अन् मुकाट्यानं काय चाललंय पाहत होता. खरंतर आपणही त्यांच्यात जाऊन दंगामस्ती करावी, गलका करावा असं त्याला खूप वाटत होतं. पण... अं.. हं.. त्याचा घसाही बसला नव्हता की पायही मुरगळला नव्हता. त्याच्या जागेवरून उठण्याची, वर्गात फिरण्याची त्याला सक्त मनाई होती. एवढंच काय वर्गात असताना, शाळेत शिरताना आपला कुणाला स्पर्शही होऊ नये म्हणून सदैव इतकी काळजी घ्यावी लागे की कल्पनाच करता येणार नाही. तुमच्यातल्या एखाद्याला थोडा वेळ जरी असं वागवलं तर? केवढी भयंकर शिक्षा, अपमान वाटेल? पण हा मुलगा मात्र तास न् तास, दिवसच्या दिवस, कित्येक महिने नव्हे वर्षानुवर्ष. म्हंजे मराठी पहिली पासून मुलांच्यात असूनही असं चमत्कारिक एकटंपण भोगत होता. का माहित्ये? फार मोठं पाप केलं होतं ना त्यानं! महाराघरी जन्म घेतला होता. आता तुम्हीच सांगा जन्म कुठं घ्यायचा हे का कुणाच्या हातात असतं? जाऊ दे ते. तुमच्या लक्षात आलं असेलच हा मुलगा म्हंजे लहानगे बाबासाहेब आंबेडकरच होते.

वर्गात दु:खी, केविलवाणे होऊन ते सारं बघत होते. तेवढ्यात एकजण म्हणाला,

"सर आले.. सर आले.."

अन् फटाफट सगळे आपापल्या जागी जाऊन बसले. एकदम

गुडीचूप! गुडीचूप! जोशी सर आले. ते गणित शिकवायचे. आता तास होता भूमितीचा.

हं.. तर त्यांनी शिकवायला सुरुवात केली. भूमितीतील एक प्रमेय! फळ्यावर त्यांनी आकृती काढली. सिद्धांत, रचना सारं सारं परत परत समजावून सांगितलं. ''कुणाला शंका आहेत का?'' विचारलं अन् मग म्हणाले,

''आता मी फळ्यावरचं पुसतो.''

सरांनी असं म्हणताच बहुतेकांना बरंच वाटलं. गणित बिणित काही सगळ्यांच्या आवडीचा विषय नसतो. खरं ना? आता सरांनी प्रमेय प्रकरण संपवलं, असा त्यांचा समज झाला. पण तो गैरसमज होता हे लागलीच लक्षात आलं. कारण सर म्हणाले,

''आत्ताचं प्रमेय फळ्यावर कोण काढील? सिद्ध करून दाखवील? हात वर करा.''

हे ऐकताच जो तो जोशीसरांची नजर चुकवू लागला. काही तर खाली मान घालूनच बसले.

''हे काय कुणाचाच हात वर नाही?'' वर्गभर नजर टाकीत सर म्हणाले आणि परत पहिल्या बेंचपासून बारकाईनं पाहायला लागले. खूष झाले. कारण एका मुलानं का होईना हात वर केला होता. अरेच्चा! हा तर शेवटच्या बेंचवरचा! त्यांना आश्चर्यच वाटलं. कारण शेवटच्या बेंचवर बथ्थड, बुद्धू, ढ च बसतात, तेव्हाही असाच समज होता. खात्री करून घेण्यासाठी त्यांनी विचारलं,

''तू.. तू फळ्यावर काढून, समजावून सांगशील?''

''हो.. हो सर. अगदी तुमच्यासारखं.'' तो चटकन म्हणाला. सगळ्या मुलांनी माना वळवून मागं पाहिलं. अन् प्रत्येकानं म्हटलं, 'ह्याला सगळं समजलं?' पण मनातल्या मनातच हं.

''ये.. ये.. पुढं ये.'' सरांनी त्याला बोलावलं. सगळी मुलं दचकली. गोठल्यासारखी झाली. भिवा उठला होता. हो, अख्ख्या वर्गात फक्त त्याला एकट्यालाच ते प्रमेय समजलं होतं. त्याची ग्रहणशक्ती फार तीव्र होती. लक्ष्यपूर्वक एकदा वाचलं, ऐकलं की बस! एकपाठी म्हणतात ना तसा होता तो. खूप बुद्धिमान. भिवानं हात वर केला होता पण सर ये-ये म्हणाले तरी तो आपल्या

जागेवरून हलला नव्हता. तिथंच उभा होता. सर कौतुकानं म्हणाले,

''अरे ये ना रे आंबेडकर ना तू? हा घे खडू. दाखव फळ्यावर आकृती काढून.. ये.''

भिवा बेंचच्या बाहेर आला. परत थबकला. सरांना समजेना का हा एवढा संकोचतोय. त्यानं पहिलं पाऊल उचललं अन् सगळ्या मुलांनी एकसाथ सुरू केलं.

''सर.. सर..''

''गलका करू नका गप्प बसा!'' सर ओरडले.

''आता तरी नीट पाहा. समजून घ्या. काढ रे आकृती. ये.''

मुलांच्यात खूप चलबिचल माजली. शेवटी एकजण धीर करून हळूच पुटपुटला.

''सर.. तो.. तो आता फळ्याला हात लावणार....''

''फळ्याला हात न लावता तुला फळ्यावर लिहिता येतं? दाखव... हा घे खडू. नसता शहाणपणा करू नकोस. चूप!''

''नाही.. म्हंजे.. तसं नाही... सर... पण त्याला फळ्याला शिवू देऊ नका.'' दुसरा गडबडत म्हणाला.

''अरे पण... का?'' सरांनी गोंधळून म्हटलं.

''त्या मागं आमचे डबे आहेत सर.'' कुणीतरी म्हणाला. त्याला सगळ्यांनी दुजोरा दिला.

''मूर्ख कुठले! तो काय तुमचे डबे घ्यायला येतोय?'' सरांना संताप आवरेना.

''नाही. पण मग आम्हाला आमचा डबा खाता नाही येणार.'' सगळे एका सुरात गाणं म्हणावं तसं बोलले. सरांना तरीही समजलंच नाही. ''नीट सांगा काय ते.'' सर तिरसटून म्हणाले.

''तो शिवला तर विटाळ होईल. सर, तो महार आहे.'' प्रत्येकजण आलटून पालटून फक्त हेच एक वाक्य म्हणत होता.

आत्ता कुठं जोशीसरांना कारण कळलं. त्यांनी भिवाकडं पाह्यलं. किती उत्साहानं, आनंदानं तो उठला होता. नंतर सरांचा-मुलांचा संवाद मुकाट्यानं ऐकत आपल्या जागी उभा होता. शेवटचं वाक्य ऐकताच तो सुन्न झाला. खरं तर असा हा पहिलाच प्रसंग नव्हता. तरीही तो दीनवाणा झाला. एकाचवेळी त्याच्या अंत:करणात

दु:ख आणि संताप दोन्ही भावना उसळल्या. सारे एका बाजूला आणि तो अगदी एकटा. सरांना वाईट वाटलं. भिवाची कणव आली. मुलांना उद्देशून ते तिरस्कारानं उदगारले,

''अरे गाढवांनो, त्याचं शिवलेलं खाल्लं तर त्याच्यासारखे थोडे तरी बुद्धिमान व्हाल. पण हे तुम्हाला सांगून काय उपयोग? मोठ्यांनी हे शिवाशिवीचं, विटाळाचं भूत तुमच्या मनात भरवलंय.'' सर जरा थांबले मग कसलासा निश्चय केल्यासारखं म्हणाले,

''आंबेडकर फळ्यावर लिहिणार आहे. मागचे डबे काढून घ्या तुमचे.''

गिधाडं तुटून पडावी, अशा तत्परतेनं ज्यानं-त्यानं फळ्यामागचा डबा उचलला. सगळेजण बेंचावर अंग चोरून बसले. त्याचा चुकून स्पर्श झाला तर? आता फळ्याकडे जाणार होता ना. तो शिवल्यावर डबा तर नाहीच खाता येणार, म्हंजे उपास घडणार. शिवाय घरी गेल्यावर आंघोळही करावी लागणार. वर घरांतल्यांची बोलणीही खावी लागणार. म्हणून सगळे बेंचाच्या आत सावरून-जपून बसले.

''ये आंबेडकर ये...'' जोशीसर खूप कौतुकानं म्हणाले.

भिवानं सगळं प्रमेय फळ्यावर आकृती काढून छान समजावून सांगितलं. जोशीसरांना राहवेना. ते इतर मुलांना म्हणाले,

''अरे, तुम्ही सगळे इथं शिकायला आलांत. वर्गात, शाळेत ह्या ज्ञानाच्या दरबारात जातपात पाहू नका. बुद्धीला महत्त्व द्या. जातीवरून माणसाला उच्च-हीन समजू नका. बुद्धीचं माप लावून त्याचं मोल करा. श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवा.''

हे जोशीसर म्हणजे ना. म. जोशी. नारायण मल्हार जोशी. पुढं ते खूप मोठ्ठे कामगार पुढारी झाले. त्यांच्यात शिक्षक असताना समतेचा भाव होता. बुद्धीचा आदर करण्याची वृत्ती होती. त्यामुळंच ते नंतर खूप मोठ्ठे कामगार पुढारी झाले असावेत.

सरांनी उपदेश केल्यानंतरसुद्धा एकाही मुलानं भिवाच्या बुद्धिमत्तेचं कौतुक केलं नाही. सारथ्याचा पुत्र म्हणून कर्णाची अशीच नेहमी हेटाळणी व्हायची. पण ह्या सगळ्या पूर्वीच्या गोष्टी. तुम्ही आजकालची मुलं. खूप विचार न करता चांगल्याचं कौतुक करता. बुद्धीचा आदर करता. हो की नाही?

BVBK-0403645



३६८४ ८१३/२०००

## ❊ आमची प्रकाशने ❊

- **छोटू** / यदुनाथ थत्ते / रु. ८/-
  मातृभूमीवरील प्रेमाचे उदात्त चित्रण. एका पक्षाची कहाणी.
- **विनोबांच्या गोष्टी ( १ ते ३ )** / राजा मंगळवेढेकर / रु. २९/-
  संत विनोबांच्या जीवनातील काही वेचक-वेधक प्रसंगांचे शब्दचित्रण.
- **आनंद गोष्टी** / राजा मंगळवेढेकर / रु. १०/-
  ठळक टाईप, मोठी चित्रे आणि संस्कारक्षम कथा.
- **शहाणे गाढव** / राजा मंगळवेढेकर / रु. २०/-
  विनोदी मनोरंजक कथा.
- **श्रीकृष्णाच्या चातुर्यकथा** / राजा मंगळवेढेकर / रु. २२/-
  श्रीकृष्णाचे चातुर्य, हजरजबाबीपणा दाखविणाऱ्या संस्कारक्षम कथा.
- **बहाद्दूर बेटा** / मो. रा. वाळिंबे / रु. १८/-
  शौर्य, साहस या गुणांचा संस्कार करणाऱ्या कथा.
- **कथाभारती** / डॉ. वसंत डोळस / रु. १८/-
  संस्कारक्षम कथांचा खजिना.
- **का व कसे ?** / सुनील अंबिके / रु. ३५/-
  मुलांच्या मनातील विविध प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे. आवश्यक तेथे आकृतीसह !
- **हसा ! मुलांनो हसा !** / सुनील अंबिके / रु. १८/-
  १५१ विनोदांचा संग्रह.
- **अग्नी** / वर्षा गजेंद्रगडकर / रु. ८/-
  संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची सोप्या भाषेत ओळख !
- **भारताच्या लोकमाता** / वर्षा गजेंद्रगडकर / रु. १५/-
  भारतातील काही प्रमुख नद्यांची माहिती.

- **विज्ञानतारका** / वर्षा गजेंद्रगडकर / रु. २२/-
  जगातील काही प्रमुख स्त्री-वैज्ञानिकांचा परिचय.
- **अशी ही साधी माणसं** / मु. शं. देशपांडे / रु. ७५/-
  उत्तुंग व्यक्तिमत्त्व लाभलेली पण 'साधी' माणसं असलेल्या व्यक्तींची शब्दचित्रे.
- **हादग्याची गाणी** / मु. शं. देशपांडे / रु. २०/-
  हादगा, भोंडला याप्रसंगी म्हणावयाची विविध गीते.
- **समारंभ गीते** / मु. शं. देशपांडे / रु. १५/-
  शाळेतील विविध समारंभांमध्ये विविध प्रसंगी सादर करण्यासाठी गीते.
- **वनस्पती मित्र** / डॉ. किशोर पवार / रु. २४/-
  विविध वनस्पतींची शास्त्रीय माहिती, त्यांचे विविध उपयोग याबद्दल माहिती.
- **हरिणांचे जातभाई** / डॉ. किशोर पवार / रु. ११/-
  सांबर, चितळ, काळवीट इत्यादी हे सारे हरिणाचे जातभाई! त्यांची सविस्तर माहिती.
- **विज्ञान जिज्ञासा** / डॉ. किशोर पवार / रु. १०/-
  विज्ञानातील चमत्कृतीपूर्ण माहिती.
- **प्रदूषण एक समस्या** / डॉ. किशोर पवार / रु. २०/-
  विज्ञानातील चमत्कृतीपूर्ण माहिती.
- **प्राणीसृष्टी** / डॉ. किशोर पवार / रु. २०/-
  सहसा चटकन दृष्टीस न पडणाऱ्या प्राण्यांची माहिती.
- **पक्ष्यांची दुनिया** / डॉ. किशोर पवार / रु. १६/-
  पक्ष्यांच्या विविध सवयी, त्यांचे प्रजोत्पादन, वसतीस्थाने याबद्दल माहिती.
- **असे हे विहंग** / रमेश महाले / रु. १८/-
  पक्षी जीवनातील विविध माहिती.

- **साप व माशांची दुनिया** / रमेश महाले / रु. २०/-
  विविध प्रकारचे साप व मासे यांविषयी माहिती.
- **असे हे प्राणी** / रमेश महाले / रु. १८/-
  प्राणी जगतावरील लेखांचा संग्रह.
- **देवकीनंदन गोपाला** / मधू पोतदार / रु. १६/-
  संत गाडगेबाबांचे छोटेखानी चरित्र.
- **बलसागर भारत....** / साने गुरुजी / रु. ६०/-
  पू. साने गुरुजींच्या देशभक्तीपर गेय-कविता.
- **कथा आणि कथाकथन** / राजा मंगळवेढेकर / रु. ७०/-
  कथाकथनाचा तंत्र आणि मंत्र काही कथांच्या उदाहरणासह उकलून दाखविणारे पुस्तक.
- **साहित्य वैभव** / डॉ. बाबुराव गायकवाड / रु. ५०/-
  तौलनिक साहित्याभ्यासासाठी विविध वाङ्मय प्रकाशातील अनुवादित लेखांचा संग्रह.
- **सत्य आणि स्वप्न** / केशव महागावकर / रु. ८०/-
  मानवी जीवनाच्या सूक्ष्म निरीक्षणातून साकारलेल्या कथा.
- **स्वप्नपक्षी** / दीपक चैतन्य / रु. ८०/-
  सकस आणि नाट्यमयता जपणाऱ्या कथा.
- **प्रदूषण : एक समस्या** / डॉ. किशोर पवार / रु. २०/-
  सध्या सर्वत्र चर्चिल्या जाणाऱ्या विषयाची सांगोपांग माहिती.
- **समरकथा** / राजा मंगळवेढेकर / रु. १८/-
  १९६२ मधील चीन-भारत युद्धातील काही रोमहर्षक कथा.
- **स्वामी दयानंद सरस्वती** / मेघा अंबिके / रु. ३०/-
  स्वामी दयानंद सरस्वतींचे चरित्र.



# विद्येच्या वाटेवर......

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण ' घटनाकार ', ' दलितांचे उद्धारकर्ते ' म्हणून ओळखतो. बाबासाहेबांना हे साध्य झाले ते शिक्षणामुळे ! त्यांनी म्हणूनच आपल्या दलित बांधवांना संदेश दिला, ' जो वाचेल, तोच वाचेल ! '

त्यांनी आपले ध्येय गाठले ते शिक्षणाच्या जोरावर ! परंतु हे शिक्षण त्यांना सहजासहजी मिळाले का ? नाही. विविध संकटांना तोंड देत, समाजातील स्पृश्य-अस्पृश्य भेदाला सामोरे जावे लागले. एकंदरीतच ' विद्येच्या वाटेवर..... ' त्यांना काय अनुभव आले ? हे अतिशय ओघवत्या शैलीत, छोट्या छोट्या प्रसंगांतून मांडले आहे.